बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१२ गोंदिया | अंक ३१ | बुधवार,दि.१३ सप्टेंबर २०२३ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024






गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध


# येत्या हिवाळी अधिवेशनावर ओबीसी महामोर्चा काढण्याचा निर्धार

## सोमवारला गोंदियात ओबीसींचा जनाक्रोश आंदोलन




**मुंबई:–** महाराष्ट्रातील मराठा समाजाला कुणबी जातींचे प्रमाणपत्र देऊन ओबीसीमध्ये समाविष्ट करण्यासाठी मराठा संघटनानी राज्य सरकारवर प्रचंड दबाव निर्माण केला आहे.जालना जिल्ह्यातील अंतरवली गावात उपोषण सुरु आहे. राज्य सरकारसुद्धा एकापाठोपाठ एक जीआर काढून मराठा समाजाला मागील दाराने ओबीसीमध्ये घुसविण्यासाठी प्रयत्न करीत आहे. तर दुसरीकडे ओबीसींच्या अनेक गंभीर प्रश्नांकडे सरकार कानाडोळा करीत आहे. अनेक वर्षे जातनिहाय जनगणनेची मागणी ओबीसी करीत आहे.




मराठा समाजाचे ओबीसीकरण रोखण्यासाठी, शासनाने जातनिहाय जनगणना करण्यासाठी तसेच अन्य समस्यांबाबत एकमत करून आगामी लढा उभारण्यासाठी मराठी पत्रकार संघाच्या भवनात महाराष्ट्रातील सर्व ओबीसी संघटना तसेच ओबीसीमध्ये समाविष्ट जाती संघटनांची संयुक्त परिषद अध्यक्ष प्रकाशआण्णा शेंडगे यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत सर्व महाराष्ट्रातून आलेल्या सर्व ओबीसी संघटनाच्या प्रतिनिधींनी एकसुरात सध्याच्या मराठा आंदोलनाकडे सरकार ज्यापध्दतीने लक्ष देत ओबीसीकंडे दुर्लक्ष करीत आहे,त्याविरोधात आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला.सोबतच येत्या ऑक्टोंबर महिन्यात मुंबई मंत्रालयाचा घेराव तर येत्या नागपूरातील हिवाळी अधिवेशनावर ओबीसींचा आरक्षण बचाव व जातनिहाय जनगणनेच्या मागणीला घेऊन ओबीसी महामोर्चा आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला.सोबतच ओबीसीती कुणबी बांधवाचा समावेश ज्या मराठाकरीता तयार करण्यात आलेल्या सारथी संस्थेत करण्यात आलेला आहे,त्या संस्थेतून आमच्या कुणबीबांधवाना वगळून महाज्योती संस्थेला लोकसंख्येच्या प्रमाणात निधी देण्याची मागणी करण्यात आली.सोबतच वसतीगृह व आधार योजनेकरीताही आंदोलनाचा निर्णय घेण्यात आला.

या बैठकीला ओबीसी जनमोर्च्याचे कार्याध्यक्ष चंद्रकांत बावकर,विलास काळे, ज्ञानेश्वर गोबरे, प्रा.रमेश पिसे,दिंगबर सुतार, डॉ.डी.के.पवार,लोकजागरचे ज्ञानेश्वर वाकुडकर,ओबीसी सेवा संघाचे प्रदिप ढोबळे,राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे सचिन राजुरकर,धनराज वंजारी,एड.मंगेश ससाने,मृणाल ढोले पाटील, मच्छिंद्‌ भोसले,टि.पी.मुंडे,जे.डी. तांडेल,माधव कांबळे उमेश कोर्राम, खेमेंद्र कटरे,अनिल डहाके, गोपाल सेलोकर,सचिन खांडेकर,कृष्णा वणे, वंसत बेले अरुण सांगळे दिगबंर पवार कांचन नाईक, प्रदिप वादाफळे, दत्ताभाऊ चेचर संभाजीनगर ओबीसी जनमोर्चा पल्लवी रेणके,पुणे समता परिषदेच्या अध्यक्ष गौरी पिंगळे आदी ओबीसींचे पदाधिकारी उपस्थित होते.





## आरक्षणाला घेऊन कुणबी समाज आक्रमक



**गोंदिया:–** मराठा समाजाला कुणबी जात प्रमाणपत्र देऊन ओबीसीमधून आरक्षण देण्याबाबत मराठा समाजाचे आंदोलन सुरू आहे. त्यामुळे शासनाने शासन निर्णयाद्वारे मराठा समाजास कुणबी जात प्रमाणपत्र देण्याबाबत प्रक्रिया सुरू केली आहे. त्यामुळे आरक्षणाला घेऊन कुणबी समाज आक्रमक झाले आहे. शासन निर्णय तात्काळ रद्द करुन मराठा समाजाला कुणबी जात प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया थांबविण्यात यावी, अशी मागणी गोंदिया जिल्हा कुणबी समाज संघर्ष कृती समितीच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना पाठविलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे.

निवेदनात, मराठा समाजाने यापूर्वी स्वतंत्र आरक्षणाची मागणी केली होती. परतु, मराठा समाज मागास प्रवर्ग सिद्ध करून सकल्यामुळे सवीच्च न्यायालयाने मराठा समाजाचे आरक्ष रद्द केले. आता कुणबी जात प्रमाणपत्र मिळवून ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळवू, अशी भूमिका मराठा समाजाने घेतलेली असल्याचे दिसून येत आहे. मराठा समाजाला आरक्षण देण्यास कुणबी समाजाचा विरोध नाही. परंतु, कुणबी जात प्रमाणपत्र देवून ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देण्यास समाजाचा तीव्र विरोध आहे. शासनाने भविष्यात मराठा आणि कुणबी समाजात वाद निर्माण होईल, असा निर्णय करू नये आणि ओबीसींच्या हक्काच्या आरक्षणात समाविष्ट करू नये, अशी मागणी कुणबी समाजाने केली आहे. शासनाने कुणबी समाजाबाबत अनुचित निर्णय घेतल्यास राज्यात मोठे संघर्ष आंदोलन उभारणार, असाही इशारा गोंदिया जिल्हा कुणबी संघर्ष कृती समितीने दिला आहे. निवेदन देतेवेळी, कुणबी संघर्ष कृती समितीचे जिल्हाध्यक्ष रमेश कुथे, सदस्य गजेंद्र फुंडे, दुलिचंद कुथे, मोरेश्वर कुथे, श्रावण सिंगनजुडे, राम गायधने, रमेश निंबार्ते, मनोहर मेंढे, अंकित कोरे, राजकुमार कुथे, सीए राजेश चतुर, शैलेंद्र फुंडे, रमेश कुथे, राजेश तावाडे, राहूल फेंडारकर, गजेंद्र बांते, प्रेमलाल कडव, मुकेश राखडे, मुकेश राखडे, रामकृष्ण चौधरी उपस्थित होते.

# पार्टीकरिता आलेल्या युवक-युवतींची गावात हुल्लडबाजी

### सटवावासींशी केली असभ्य वर्तणूक; गावकऱ्यांनी घातला फार्महाउसला घेराव



**गोंदिया :** गोरेगाव तालुक्यातील सटवा गावाच्या हद्दीतील फार्महाउसवर पार्टीकरिता आलेल्या युवक-युवतींनी सटवा गावात चारचाकी वाहनाने फिरत हुल्लडबाजी केली. त्यांना हुल्लडबाजी करू नका म्हणून समजाविण्याचा प्रयत्न करणाऱ्या गावकरी व ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांच्याशी त्यांनी असभ्य वर्तणूक केली. त्यामुळे शेकडो नागरिकांनी फार्महाउसला घेराव घातला. रविवारी (ता. १०) सायंकाळच्या सुमारास ही घटना घडली. घटनास्थळी पोलिसांची कुमक मागवण्यात आली होती.

सटवा येथे अगदी हाकेच्या अंतरावर असलेल्या शेतजमिनीवर गोंदिया येथील अग्रवाल नामक उद्योगपतीने आलिशान फार्महाउस बांधले आहे. या फार्महाउसवर रविवारी वाढदिवसाची पार्टी आयोजित करण्यात आली होती. या पार्टीनिमित्त आलेल्या काही तरुण व तरुणींनी चारचाकी वाहनाने गावात फेरफटका मारत गाडीवर डीजेचे गाणे वाजविले. इतकेच नव्हे, तर हातवारे करत हुल्लडबाजी केली. त्यामुळे गावातील चौकात ग्रामपंचायत सदस्य ठाकूर यांनी त्यांना थांबवून हे गाव आहे, यात अशाप्रकारची हुल्लडबाजी योग्य नाही.

जे करायचे ते फार्महाउसच्या आत करा, असे सांगून त्यांना

**गावकऱ्यांनी फार्महाउसला घेराव घातल्याची माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी पोहोचले. परिस्थिती नियंत्रणात आहे. या घटनेची मात्र, अद्याप कोणीही तकार केली नाही.**
**-श्री. केंजळे, पोलिस निरीक्षक, गोंदिया ग्रामीण, पोलिस ठाणे.**

समजविण्याचा प्रयत्न केला. मात्र, या युवक-युवतींनी त्यांच्याशी वाद घालून मारहाण करण्याचा प्रयत्न केला व तिथून ते फार्महाउसवर पोहोचले.

या प्रकरणाची माहिती गावात वाऱ्यासारखी पसरली. आपल्याच गावात येऊन हुल्लडबाजी करून गावातील पदाधिकाऱ्यांवर हात उगरण्याचा प्रकार असह्य झाल्याने किमान १०० ते १५० नागरिकांनी फार्महाउससमोर जमा होत घटनेचा निषेध केला. विशेष म्हणजे, यावेळी फार्महाउसवर एका पुढाऱ्याची पत्नी उपस्थित होती, गावकरी जमा झाल्याचे लक्षात येताच त्यांनी या घटनेची माहिती आपल्या कार्यालयाला दिली. लगेच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत गावकऱ्यांना घटनास्थळावरून पांगवून परिस्थिती नियंत्रणात आणली. असे असले तरी गावकऱ्यांमध्ये तीव्र संताप आहे. दरम्यान, गावाच्या शांततेला भंग करणारे हे फार्महाउस बंद करण्याची मागणी गावकऱ्यांनी केली आहे.

# सहा लाखांचे बक्षीस असलेल्या तीन जहाल नक्षलवाद्यांना अटक

**गडचिरोली :** विविध गंभीर गुन्ह्यात सहभागी असलेल्या तीन जहाल नक्षलवाद्यांना अटक करण्यात गडचिरोली पोलिसांना यश आले आहे. छत्तीसगड सीमेवरील भामरागड तालुक्यातील अतिदुर्गम ताडगाव व कियर जंगलात ही कारवाई करण्यात आली. सरजू ऊर्फ छोटू बंडू महाका (२८), मधु ऊर्फ अनू महारु कुमोटी (२३) , दोघेही रा. हलेवारा ता. भामरागड, अशोक लाला तलांडी (३०, रा. पासेवाडा, ता.कुडरू जि. बिजापूर, छत्तीसगड) अशी त्यांची नावे आहेत.



भामरागड हद्दीतील तालुक्यातील ताडगाव जंगल परिसरात विशेष पथकाचे जवान नक्षलविरोधी अभियान राबवित होते. यावेळी त्यांना वॉँटेड नक्षलवादी सरजू ऊर्फ छोटू महाका व मधु ऊर्फ अनू कुमोटी हे दोघे जंगलात असल्याची माहिती मिळाली. त्यावरुन तेथे शोधमोहीम राबवून दोघांना बेड्या ठोकल्या. त्यानंतर पथकाने भामरागड हद्दीतील कियर जंगल परिसरात अशोक तलांडी या छत्तीसगडच्या नक्षल्याच्या मुसक्या आवळल्या. तिन्ही नक्षलवाद्यांवर शासनाने प्रत्येकी दोन लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. तिघांनाही भामरागड न्यायालयात हजर केले असता तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.

सरजू महाका हा २०१० मध्ये नक्षली चळवळीत आला. २०१८ मध्ये त्याने चळवळ सोडली. या दरम्यान दोन निरपराध व्यक्तींचे खून, पोलिसांशी चकमक, विसामुंडीजवळ पुलाच्या कामावरील ठेकेदाराचा जेसीबी व सिमेंट मिक्सर जाळल्याचा त्याच्यावर आरोप आहे. मधु कुमोटी हा २०१५ मध्ये सदस्य म्हणून नक्षली दलममध्ये सामील झाला. दोन निरपराध व्यक्तींच्या खुनासह तीन चकमकीत त्याचा सहभाग होता. अशोक तलांडी हा छत्तीसगडच्या सँड्रा दलममध्ये भरती झाला होता. दोन वर्षांपासून त्याने चळवळ सोडली होती. मात्र, अधूनमधून नक्षल्यांना तो प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य करत असे. अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

# सारस पक्ष्यांचे होणार सॅटेलाईट टॅगिंग,वनमंत्र्यांचे ट्वीट

**गोंदिया:–** गोंदिया आणि भंडारा जिल्ह्यात आढळणाऱ्या सारस पक्ष्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. त्याकरिता न्यायालयाने देखील वनविभागाला फटकारले होते. मात्र त्यानंतर आता सारस संवर्धन आणि संख्या वाढविण्यासाठी सारस पक्ष्यांचे सॅटेलाईट टॅगींग करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. त्यांदर्भात राज्याचे वनमंत्री तसेच गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी ट्वीट करत ही माहिती दिली.

सारस पक्षी राज्यातूनच नव्हे, तर देशातून लुप्त झाला आहे. मात्र गोंदिया भंडारा जिल्ह्यात वैनगंगा नदीच्या काठावरील गावांमध्ये ते आढळून येतात. परंतु, गेल्या काही वर्षांपासून सारस संवर्धनाकडे शासनाचे दुर्लक्ष झाले. त्यामुळे दरवर्षी त्यांची संख्या लक्षणीय रित्या कमी होत चालली आहे. गोंदिया-भंडारा जिल्ह्यासह मध्यप्रदेशातील बालाघाट सीमेवरील काही गावांमध्ये देखील सारस पक्ष्यांचे अधिवास आहे. मध्यंतरी सारस पक्ष्यांची संख्या कमी होत असल्यामुळे याची दखल घेत न्यायालयाने देखील चिंता व्यक्त केली होती.

विदर्भातील सारस पक्ष्यांच्या संवर्धनासाठी गोंदिया वन विभाग आणि बीएनएचएसमध्ये सामंजस्य करार करण्यात आला आहे. वनविभागाला फटकार देखील लगावली होती. त्यानंतर आता वनविभाग, महसूल विभाग आणि कृषी विभागाद्वारे सारस संवर्धनाचे पाऊल उचलण्यात आली आहे. वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी ट्वीट करत गोंदिया आणि भंडारा जिल्ह्यात तसेच विदर्भातील सारस पक्ष्यांच्या संवर्धनासाठी सॅटेलाईट टॅगिंग करण्यात येणार असल्याचे म्हटले आहे. गोंदिया त्यासाठी वनविभाग आणि बीएनएचएस मध्ये सामंजस्य करार झाल्याची माहिती दिली.



या माध्यमातून सारस पक्ष्यांचा अधिवास, त्यांची ठिकाणे, प्रजननाचा काळ आणि स्थलांतर आदी बाबींचा निक्षून अभ्यास करणार आहे. सारस प्रेमींकरिता ही आनंदाची बाब आहे. मात्र ज्या भागात सारस पक्ष्यांचे अधिवास आहे, तेथे जनजागृती करुन सारस संवर्धनासाठी धडपड करणाऱ्यांना मानधन देण्याची मागणी केली आहे.

## बिरसी विमानतळावर प्रकल्पग्रस्तांचा मोर्चा

**गोंदिया :** बिरसी विमानतळ प्रकल्पग्रस्तांच्या पुर्नवसनाचा प्रश्न अजूनही मार्गी लागला नाही. समस्या ज्जैसे थेफआहेत. त्यामुळे विमानतळ प्रशासनाने पुनर्वसनाचा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावावा, अन्यथा मोठे आंदोलन केले जाईल, असा इशारा बिरसी विमानतळावर धडकलेल्या १०६ कुटुंबातील प्रकल्पग्रस्तांनी दिला. सोमवारी (ता. ११) गावातून विमानतळाच्या गेटपर्यंत मोर्चा काढून आपला रोष व्यक्त केला.

अतिक्रमण आणि अन्य काही कारणे सांगून शासन व विमानतळ प्रशासनाने काही वर्षांपूर्वी १०६ जणांची घरे तोडली. या सर्व कुटुंबाचे पुनर्वसन केले जाईल, असे आश्वासन दिले गेले. परंतु, अद्यापही पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी लागला नाही. गेल्या तीन ते चार वर्षांपासून प्रकल्पग्रस्तांच्या मागणीकडे शासन, प्रशासन दुर्लक्ष करीत आहे. इतकेच नव्हे, अनेक समस्या कायम असताना आश्वासनापलिकडे कुठलाही तोडगा काढला जात नाही.

# मराठ्यांना ओबीसीमधून आरक्षण देण्याच्या बाजूने मी नाहीचं प्रदेशाध्यक्ष नाना पटोले

**गोंदिया:–** राज्यात सध्या ओबीसीमधून मराठ्यांना आरक्षण देण्यात यावे तसेच कुणबी जातीचे प्रमाणपत्र सरसकट देण्याच्या मागणीला घेऊन जे आंदोलन सुरु आहे. त्या आंदोलनाचे पाप हे भारतीय जनता पक्षाच्या सरकारचे आहे. भाजपनेच मराठ्यांना चुकीच्या पध्दतीने आरक्षणाकरीता हुलकावणी लावल्याचा आरोप करीत आपण कधीही मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देण्याची भूमिका घेतली नाही. उलट सरकारने जातीय जनगणना करुन लोकसंख्येच्या प्रमाणात काय तो निर्णय घ्यावा असे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांननी म्हटले आहे. पटोले हे गोंदिया शहरात जनसंवाद यात्रेच्या निमित्ताने आले असता पत्रकार परिषदेत बोलत होते.



पटोले पुढे म्हणाले की, जोपर्यंत जातीय जनगणना होत नाही तोपर्यंत या समस्येचा निकाल लागणार नाही. त्यातच ५० टक्केची आरक्षणावर लावलेली मर्यादा हटविण्यात यावे. राज्यातील सरकारचे केंद्रातील सरकार ऐकत असल्याने येत्या संसदेच्या विशेष अधिवेशनात ५० टक्केची मर्यादा काढून टाकण्याकरीता राज्य सरकारने प्रधानमंत्री यांच्याकडे मागणी करुन जनगणन करावी असेही म्हटले. आपण मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्यात यावे असे कधीच बोलले नाही. विरोधी पक्षाचे आमदारांना कमी ऐकायला जाते त्याबद्दल मी काही बोलू शकत नाही.सारथी संस्थेतील कुणबी समाजाच्या समावेशावर मात्र सारथीमध्ये कुणबी समाज नसल्याचे पटोलेंचे म्हणने आहे.

काँग्रेसच्या रायपूरच्या राष्ट्रीय अधिवेशनातही जातनिहाय जनगणनेचा मुद्दा पारीत करण्यात आला असून मुंबई येथे पार पडलेल्या इंडिया आघाडीच्या बैठकीतही काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी सरकार येताच जातनिहाय जनगणना करण्याचा मुद्दा ठेवला आणि त्यास सर्वच पक्षांनी समंतीही दर्शविल्याचे पटोले यांनी सांगितले.

सोबतच राज्यातील सरकारला दिड दोन वर्षात पुर्ण मंत्रीमंडळाचे गठण करुन पालकमंत्री नेमता आले नाही याशिवाय दुसरे दुर्देव नसल्याचे टिका करीत राज्यात दुष्काळी परिस्थिती असताना जिल्ह्यांना पालकमंत्री नसल्याने अनेक योजनांवर निर्णय होत नसल्याचेही म्हणाले. भ्रष्टाचारी लोकांना तुरुंगात पाठवण्याची भिती दाखवून आपल्या पक्षात आणने किंवा सोबत आणण्यावर देशातील हुकूमशहाचे काम सुरु असल्याचेही पटोले म्हणाले.

# नागपूरच्या संविधान चौकात सर्व शाखीय कुणबी समाजाचे आंदोलन

## ओबीसी आरक्षणात मराठ्याना आरक्षण देण्यास विरोध




**नागपूर:–** येथील संविधान चौकात सर्व शाखीय कुणबी ओबीसी कृती समितीच्या वतीने मराठा समाजाला कुणबी ओबीसी समाजाचे आरक्षण देण्याच्या भुमिकेला विरोध करण्यासाठी एल्गार पुकारण्यात आला. आज संविधान चौकात आंदोलनासाठी स्थापन करण्यात आलेल्या कृती समितिचे अध्यक्ष पुरुषोत्तम शहाने पाटील यांच्या नेतृत्वात हे आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनात सर्व शाखीय कुणबी समाज संघटनेचे गुणेश्वर आरिकर, राजेश काकडे, रमेश चोपडे, जानराव केदार, प्रल्हाद पडोळे,प्रा अवंतिका लेकुरवाळे,बाबा तुमसरे सुरेश गुडधे पाटील, राजेंद्र कोरडे, सुरेश वर्षे, राजेश काकडे, राज तिजारे, बाळा शिंगणे, मिलिंद राऊत, राजेश चुटे,सुरेश कोंगे, सुषमा भड , अरुण वराडे, डॉ राजेश ठाकरे, विवेक देशमुख सहभागी झाले होते. आंदोलनाच्या प्रास्तविकेत अवंतिका लेकुरवाळे यांनी ओबीसी समाजामध्ये आरक्षण मागण्याचा संवैधानिक अधिकार मराठा समाजाला नाही. तरी सुध्दा सरकार मराठ्यांची दिशाभूल करीत आहे.यासाठी दीर्घ कालीन आंदोलन समाजाला करावे लागणार आहे.

पहिल्या दिवशी या आंदोलनाला विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, माजी मंत्री नितिन राऊत, माजी आमदार डॉ आशिष देशमुख, सुधाकरराव कोहळे, दिनानाथ पडोळे, माजी राज्यमंत्री डॉ.परिणय फुके, राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष बबनराव तायवाडे यांच्यासह आजी माजी लोकप्रतिनिधींनी या आंदोलन मंडपाला भेट दिली.

ओबीसी समाज मराठ्यांच्या घुसखोरीवर चिडलेला असून सरकारने ही बाब गांभीर्याने घेतली नाही तर ओबीसी समाजाचा आक्रमक भूमिकेत येईल असा सुर आंदोलनातून निघाला. आंदोलनाला संताजी नवयुवक मंडळाच्या वतीने सुभाष घाटे, मुस्लिम समाजाचे शकील पटेलव कास्ट्राईब संघटनेचे अरुण गाडे यांनी सुध्दा पाठिंबा जाहीर केला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अनेक युवक, महिला, तसेच विविध ओबीसी जातीमधील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संपादकीय

## जरांगेच्या आंदोलन मराठा ओबीसी संघर्ष पेटणार

सर्वोच्च न्यायालयाने मराठा समाजाला दिलेले आरक्षण नाकारल्यानंतर मनोज जरांगे-पाटील यांच्या उपोषणाने पुन्हा हा मुद्दा राज्याच्या केंद्रस्थानी आला आहे. मराठा समाजाला आरक्षण देण्यास कुणाचाच विरोध नाही. मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे, अशी सर्वच राजकीय पक्ष व नेत्यांची भूमिका आहे. अन्य कोणत्याही समाजाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण दिले जाईल अशी राज्याच्या अनेक मुख्यमंत्र्यांनी यापूर्वी भूमिका मांडली आहे व तीच भूमिका आजचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे मांडत आहेत. मराठा आरक्षणासाठी गेले पंधरा दिवस जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील अंतरवाली सराटी येथे उपोषण करणारे जरांगे-पाटील यांनी उपोषण मागे न घेता, सरकारला मराठा आरक्षण देण्यासाठी आणखी एक महिन्याची मुदत देत असल्याचे सांगितले. जरांगे-पाटील यांनी गेले दोन आठवडे सरकारचे या संवेदनशील प्रश्नाकडे लक्ष वेधून घेतले आहे, हेच त्यांचे मोठे यश आहे. सरकारही मराठा समाजाला कसे आरक्षण देता येईल यासाठी वेगवेगळ्या स्तरावर प्रयत्न करीत आहे. पण उपोषण मागे घेताना सरकारला कालबद्ध अटी घालणे हे योग्य आहे का, असा प्रश्न निर्माण होतो.

जरांगे-पाटील यांच्याविषयी शिंदे-फडणवीस-अजित पवार सरकारने सुरुवातीपासून सहानुभूती ठेवली आहे. उपोषण मागे घ्यावे यासाठी त्यांनी जरांगे-पाटील यांना अनेकदा आवाहन केले. त्यांच्या आंदोलनाच्या निमित्ताने मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर कसा मार्ग काढता येईल यावर सरकारने सर्वपक्षीय बैठकही मुंबईत बोलावली. सर्वपक्षीय बैठकीत जरांगे -पाटील यांनी उपोषण मागे घ्यावे असे त्यांना आवाहन करण्यात आले. खरं, तर अशा आवाहनानंतर त्यांनी लगेचच आपले उपोषण मागे घ्यायला हवे होते. त्यांनी केलेल्या मागणीनुसार सरकारने आंदोलकांवर झालेल्या लाठीमार प्रकरणी चार पोलीस अधिकऱ्यांना निलंबित केले. आंदोलकांवर नोंदवले गेलेले गुन्हे मागे घेण्यात येतील, असेही सरकारने जाहीर केले. जरांडे-पाटील यांनी पाठविलेल्या शिष्टमंडळाबरोबरही सरकारने चर्चा केली. मराठा समाजाला कसे आरक्षण देता येईल व कुणबी म्हणून प्रमाणपत्र देता येईल का? याचा अहवाल देण्यासाठी सरकारने समिती नेमली. सरकारच्या वतीने गेल्या दोन आठवड्यांत तीन-चार मंत्री व काही आमदारही उपोषणस्थळी जाऊन जरांगे-पाटील यांना भेटले व त्यांची भूमिका समजावून घेतली तसेच सरकारची भूमिकाही त्यांना पटवून देण्याचा प्रयत्न केला. जरांगे-पाटील यांनी उपोषण पुढे चालू ठेवू नये यासाठी सरकारने बरचे प्रयत्न केले. पण मराठ्यांना सरसकट कुबणी प्रमाणपत्र द्यावे, या संवेदनशील मुद्द्यावर निर्णय घेताना कायदेशीर बाबी काटेकोर तपासाव्या लागणार आहेत. तसेच या निर्णयाचे सामाजिक परिणाम काय होतील याचाही वेध घ्यावा लागणार आहे. मराठा विरुद्ध ओबीसी असा संघर्ष होणार नाही, याचीची दक्षता घ्यावी लागणार आहे.

अण्णा हजारेंपासून अनेक जणांनी अनेक विषयांवर राज्यात यापूर्वी उपोषण केले आहे. पण जरांगे-पाटील यांनी मांडलेला विषय अत्यंत संवेदनशील आहे. मराठा समाजाला न्यायालयात टिकेल असे आरक्षण देणे आवश्यक आहे. यापूर्वी दिलेले आरक्षण सर्वोच्च न्यायालयात टिकलेले नाही, हा अनुभव लक्षात घेऊन महायुतीचे सरकार काळजीपूर्वक पावले टाकत आहे. जरांगे-पाटील यांनी सुरुवातीला मराठवाड्यातील मराठा समाजाची भूमिका मांडली. निजाम काळात मराठा समाजाच्या कागदपत्रांवर कुणबी असा उल्लेख आहे, म्हणून या समाजाला सरकारने कुणबी प्रमाणपत्रे द्यावीत ही त्यांची सुरुवातीला मागणी होती. त्यानुसार सरकारने राज्य मंत्रिमंडळाची बैठक घेऊन तसा निर्णय घेतला व निजामकालीन कागदपत्रांमध्ये वंशावळीचा उल्लेख कुणबी असेल तर त्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्यास सरकारची मान्यता आहे, असा जीआर निघाला. पण त्याने जरांगे-पाटील यांचे समाधान झाले नाही. सर्व मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र देण्यात यावे यासाठी ते हटून बसले व त्यांचे उपोषण त्यांनी चालूच ठेवले. मराठ्यांना सरसकट कुणबी प्रमाणपत्र द्यावे अशी मागणी यापूर्वी कोणी केली होती का, या शोध घ्यावा लागेल. गेले पंधरा दिवस जरांगे-पाटील जे सांगत राहिले व सरकार ते ऐकत राहिले असे वातावरण होते.

आपण आंदोलनाचे स्थळ सोडणार नाही, एक महिन्यानंतर ३१व्या दिवशी कुणबी प्रमाणपत्र वाटायला सुरुवात केली नाही तर मंत्र्यांना फिरू देणार नाही, अशी भाषा ते का वापरत आहेत? बेमुदत उपोषण करून त्यांनी सरकारवर दबाव टाकला आहेच, आता सरकारला धमकीची भाषा वापरत आहेत. आरक्षण देण्याची जबाबदारी सरकारची आहे, असे ते सरकारला सारखे बजावत आहेत. राज्याचे मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री व संपूर्ण मंत्रिमंडळ यांना आमच्या उपोषणस्थळी यावे लागेल असे ते सांगत आहेत. यातून त्यांना काय सुचवायचे आहे. कोणताही निर्णय घाईघाईने घेणे सरकारला धोकादायक ठरू शकते. सरकार मराठा आरक्षणासाठी सकारात्मक आहे. आरक्षण कायद्याच्या निकषावर टिकेल अशा पद्धतीने देता यावे म्हणून काळजीपूर्वक पावले उचलत आहे. मग सरकारवर वेळेची मुदत देऊन दबाव टाकणे योग्य आहे का? बळाचा वापर करणाऱ्या पोलिसांवर कारवाई आणि आंदोलकांवरील गुन्हे मागे या प्रमुख मागण्या सरकारने मान्य केल्या आहेत. स्वत: गृहमंत्र्यानी पोलीस बळाचा वापर झाला म्हणून दिलगिरी व्यक्त केली आहे. सरकार हे समाजाचे विश्वस्त व पालक आहे. त्यामुळे आता सरकारबरोबर नियमित संवाद चालू ठेवणे गरजेचे आहे.

# ओबीसी आरक्षणाचा प्रवास!

- स्वातंत्र्यपूर्व भारतात ओबीसी आरक्षणाची स्थिती काय होती?
- स्वातंत्र्यानंतर या संदर्भात कशी आणि काय पावलं उचलली गेली?
- मंडल आयोगानं यात नेमकी काय भूमिका बजावली?
- ५२ टक्के आरक्षण लागू होण्याची पार्श्वभूमी काय होती?

**विनोद वाघमारे**

मराठा समाजाला आरक्षण देण्यात यावं, या मागणीवरुन अवघ्या महाराष्ट्राचं वातावरण आठवडाभरापासून तापलेलं आहे. आंदोलनांमधून मराठा समाजबांधव आपली मागणी रेटून धरत आहेत. हे घडत असतानाच दुसरीकडं ओबीसी आरक्षणातून मराठ्यांची मागणी पूर्ण करता येणं शक्य असल्याचा आवाज वाढला. यामुळं ओबीसींमधून मराठ्यांना आरक्षण नकोच, असा सूर उमटू लागला आहे. निवेदनांच्या माध्यमातून सुरू झालेला हा लढा आता रस्त्यावर येण्याची शक्यताही नाकारता येत नाही. या वादात ओबीसी आरक्षणाचा नेमका प्रवास कसा आहे, मराठ्यांना समाविष्ट करण्यास ओबीसी का विरोध करत आहेत; हे जाणून घेणं महत्वाचं ठरतं.




### स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वीची आरक्षणाची गणितं

ओबीसींच्या आरक्षण प्रवास उलगडताना राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे सरचिटणीस सचिन राजूरकर सांगतात, देशाच्या स्वातंत्र्यापूर्वी ब्रिटिशांच्या राजवटीत १८७१ ते १९३१ दरम्यान दर दहा वर्षांनी ओबीसींची जनगणना करण्यात येत होती. या आधारावर देशात एकूण लोकसंख्येच्या तुलनेत ५२ टक्के ओबीसी होते. ओबीसी समाज राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक क्षेत्रामध्ये फार मागासलेला होता. ओबीसी, एससी, एसटी या सर्व बहुजनांना आरक्षण देण्यात यावं, अशी मागणी महात्मा ज्योतिबा फुले यांनी ब्रिटिश सरकारसमोर १८८२ मध्ये केली. कोल्हापूर संस्थानात १९०२ मध्ये छत्रपती शाहू महाराजांच्या शासनकाळात ओबीसी वर्गाला ५० टक्के आरक्षण देण्यात आलं होतं. याचा विशेष उल्लेख महात्मा फुल्यांनी "शेतकऱ्यांचा आसूड' या आपल्या ग्रंथात केला आहे. सामाजिक न्याय आणि सामाजिक समता या भावनेतून दिलेलं आरक्षण स्वातंत्र्यापर्यंत मिळत होतं. स्वातंत्र्यानंतर घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि तत्कालीन कृषिमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या परिश्रमानं राज्यघटनेतल्या कलम ३४० नुसार ओबीसी प्रवर्गाला आरक्षण दिलं गेलं. घटनेच्या ३४१ व्या कलमानुसार अनुसूचित जाती (एससी) आणि कलम ३४२ नुसार अनुसूचित जमातीच्या (एसटी) प्रवर्गाला आरक्षण देण्याचं नमूद करण्यात आलं. अनुसूचित जाती प्रवर्गाची पूर्ण जातीनिहाय सूची तयार असल्यामुळं सोबत "शेड्युल' (अनुसूची) जोडली गेली. ती म्हणजे अनुसूची १. सोबतच अनुसूचित जमातीची जातनिहाय पूर्ण सूची तयार असल्यामुळं त्यांची सूचीही सोबत जोडली गेली. ती म्हणजे अनुसूची २. ओबीसी संवर्गात समाविष्ट असणाऱ्या संपूर्ण जातींची यादी तयार नव्हती; त्यामुळं ओबीसींची सूची तयार होऊ शकली नाही. परिणामी घटनेच्या ३४० व्या कलमाची अंमलबजावणी करण्यासाठी पहिल्या लोकसभेत आयोग स्थापन करुन ओबीसींच्या सर्व जातींची सूची तयार करण्याची शिफारस करण्यात आली. अनुसूचित जाती आणि जमातींची सूची तयार असल्यामुळं या दोन प्रवर्गांना स्वतंत्र भारतात अनुक्रमे पंधरा टक्के आणि साडेसात टक्के आरक्षण शिक्षण आणि नोकरीमध्ये लागू करण्यात आलं. ओबीसी संवर्गातल्या जातींची यादी तयार नसल्यामुळं ओबीसींना हे आरक्षण मिळालं नाही.

### मद्रास प्रांतात आजही ओबीसींना ५० टक्के आरक्षण

मद्रास प्रांतांत १९२१ पासून सुरू असलेलं मागासवर्गीय आरक्षण १९५० मध्ये राज्यघटना अंमलात आल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार रद्द करण्यात आलं. ओबीसी नेते पेरियार रामास्वामींनी याविरुद्ध मद्रास प्रांतांत तीव्र आंदोलन केलं. त्याचा परिणाम म्हणून पहिल्यांदा घटनेमध्ये आरक्षणाची नोंद करण्यात आली. त्याचं फलित असं, की तमिळनाडूत ओबीसींना ५० टक्के आरक्षण आजही कायम आहे.

### ओबीसींसाठी बाबासाहेबांचा मंत्रिपदाचा त्याग

राज्यघटनेच्या ३४० व्या कलमानुसार ओबीसींना आरक्षणाच्या सुविधा लागू करण्याच्या हेतूनं आयोग स्थापन करण्याची शिफारस करुनही असा आयोग स्थापन करण्यात आला नाही. याबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि डॉ. पंजाबराव देशमुख यांच्यासह अन्य नेत्यांनी केलेल्या प्रयत्नांकडं तत्कालीन सरकारनं दुर्लक्ष केल्यामुळं दु:खी होऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २७ सप्टेंबर १९५१ रोजी आपल्या मंत्रिपदाचा त्याग केला. बाबासाहेबांच्या या कृतीला घाबरुन सरकारनं २९ जानेवारी १९५३ला खासदार काका कालेलकर यांच्या अध्यक्षतेखाली ओबीसी आयोगाची स्थापना केली. या आयोगाचा अहवाल ३० मार्च १९५५ रोजी राष्ट्रपतींना सादर करण्यात आला. या अहवालात ओबीसींना शिक्षण आणि नोकरीमध्ये आरक्षण, विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह, पदोन्नतीमध्ये आरक्षणाची शिफारस केली गेली. अध्यक्षांनी मात्र आयोगानं तयार केलेल्या अहवालाशी आपली व्यक्तिगत सहमती नसल्याचं पत्र राष्ट्रपतींना दिलं. नंतर तब्बल २५ वर्षांपर्यंत हा अहवाल लोकसभेच्या पटलावर ठेवण्यात आलाच नाही.

### मंडल आयोगाची स्थापना

१९७८ मध्ये पंतप्रधान मोरारजी देसाई यांचं सरकार सत्तेत आलं. ओबीसी नेत्यांनी पुन्हा कालेलकर आयोगाचा मुद्दा उपस्थित केला. या सरकारनं कोणतीही चर्चा न करता कालेलकर आयोगाचा अहवाल रद्द करुन २० सप्टेंबर १९७८ रोजी खासदार बी. पी. मंडल यांच्या अध्यक्षतेखाली नवीन आयोग स्थापन केला. या आयोगानंही दोन वर्ष अभ्यास करुन ३१ डिसेंबर १९८० रोजी आपला अभ्यासपूर्ण अहवाल राष्ट्रपतींकडं सादर केला. या अहवालानं कालेलकर आयोगाच्या शिफारशींवर शिक्कामोर्तब केलं. नंतर हा अहवालही दहा वर्ष लोकसभेच्या पटलावर ठेवण्यात आला नाही. तो मंजूरही करण्यात आला नाही. परिणामी ओबीसी प्रवर्गाला त्यांच्या घटनात्मक अधिकारापासून दूर ठेवलं गेलं. डिसेंबर १९८९ मध्ये पंतप्रधान व्ही.पी.सिंग यांच्या सरकारमध्ये मंडल आयोगाचा अहवाल मान्य करण्याची मागणी होऊ लागली. व्ही. पी. सिंग यांनी अहवालाच्या शिफारशी वाचल्यानंतर त्याबद्दल सहमती दर्शवली. शेवटी ७ ऑगस्ट १९९० रोजी लोकसभेनं मंडल आयोगाच्या शिफारशी लागू करण्यास मंजुरी दिली. या कारणामुळेच व्ही. पी. सिंग एकमात्र बहुजन पंतप्रधान म्हणून नावारुपाला आले.

### आणि लागू झालं ५२ टक्के आरक्षण

तत्कालीन पंतप्रधान व्ही.पी.सिंग यांच्या बहुजनवादी भूमिकेमुळं आणि मंडल आयोगाच्या शिफारशींना घाबरुन आरक्षणविरोधातल काही लोक ७ ऑगस्ट १९९० रोजी सर्वोच्च न्यायालयात गेले. शेवटी १९९२ मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार आरक्षणाची कमाल मर्यादा ५० टक्के करण्यात आली आणि उत्पन्न मर्यादेच्या अटी घालण्यात आल्या. या निर्णयामुळं एकूण ५० टक्के आरक्षणापैकी पूर्वीपासून सुरू असलेलं अनुसूचित जातीचं १५ टक्के आणि अनुसूचित जमातीचं ७.५ टक्के असं एकूण २२.५ टक्के आरक्षण वजा केल्यानंतर शिल्लक २७.५ टक्क्यांपैकी २७ टक्के आरक्षण १९९२ मध्ये ओबीसींना लागू करण्यात आलं. त्यासोबतच "क्रिमिलेअर'ची अट घालण्यात आली. जी सुविधा ओबीसींना १९५२ मध्येच मिळायला हवी होती; त्या अधिकारापासून ओबीसींना ४० वर्ष वंचित ठेवलं गेलं. आणि नंतरही; एकूण लोकसंख्येच्या ५२ टक्के वर्गाला नाममात्र २७ टक्के आरक्षण लागू झालं. केंद्रात ओबीसींसाठी स्वतंत्र मंत्रालय नाही, १०० टक्के दिली जाणारी शिष्यवृत्ती पाच वर्षानंतर कमी करुन ५० टक्के करण्यात आली. आजपर्यंत ओबीसी विद्यार्थ्यांसाठी एकही वसतिगृह निर्माण केलं गेलेलं नाही. ओबीसी मागासवर्गीय असूनही ॲट्रासिटी कायद्यात त्यांचा समावेश केला गेला नाही. शेतकऱ्यांना निवृत्तीवेतन नाही. देशाच्या स्वांतत्र्यानंतरही आजच्या एकूण लोकसंख्येच्या ५२ टक्के ओबीसी समाजावर हा अन्याय आहे. या अन्यायाच्या विरोधात आवाज उठवण्यासाठी आणि ओबीसी समाजाच्या घटनात्मक मागण्यांकडं राज्य आणि केंद्र शासनाचं लक्ष वेधून त्या पूर्ण करुन घेण्यासाठी ओबीसी समाजाचा लढा आजही सुरू आहे.

## राज्यसरकारच्या आदर्श शिक्षक पुरस्काराने महेंद्र सोनेवाने सन्मानित

**गोंदिया:-** समाजाची निस्वार्थ भावनेने आणि निष्ठेने सेवा करणाऱ्या व शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षकांना त्यांच्या अंगीकृत कामात प्रोत्साहन देण्याच्या व त्यांच्या गुणांचा यथोचित सन्मान करण्याच्या उद्देशाने राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर करण्यात येतात.



सन २०२२-२३ च्या क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कारासाठी गोंदिया जिल्ह्यातील माध्यमिक विभागातून महेंद्र भुवराज सोनेवाने, सहाय्यक शिक्षक, शहिद जान्या तिम्या जिल्हा परिषद हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय गोरेगाव यांना हा सर्वोच्च पुरस्कार जाहीर झाला.

पुरस्कार वितरण कार्यक्रम टाटा थिएटर, नरीमन पॉईंट मुंबई येथील सभागृहात शिक्षक दिनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, अध्यक्ष, शिक्षणमंत्री दिपक केसरकर, मंत्री मंगल प्रभात लोढा, शिक्षक आमदार कपील पाटील, विक्रम काळे (शिक्षक आमदार) या सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. देण्यात आले.

महेन्द्र भुवराज सोनेवाने यांना राज्य शासनाचे आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल शिक्षणाधिकारी (प्राथ.) महेंद्र गजभिये, शिक्षणाधिकारी (माध्य.) कादर शेख, प्राचार्य डॉ. प्रभाकर लोंढे, मुख्याध्यापिका सौ.यशोधरा सोनेवाने ,जयंत मुरकुटे, रतिराम भांडारकर, दिपेश सोनेवाने, गोकुल परदेशी, मोहन मरकाम, दिलीप रहांगडाले, माधुरी गजबे, वशिष्ठ खोब्रागडे, स्नेहल तिडके, भुमेश्वरी मुरकुटे, श्रुती सोनेवाने, प्रतिक तिडके, डॉ.मंगेष सोनेवाने, मनोज सोनेवाने, कविता लिचडे, डॉ.यु.एल. यादव, सुभाष मारवाडे, महेंद्र बघेले, वैशाली चौधरी, नंदा गजभिये, अनुश्री गोतमारे, मोरेश्वर पटले, शत्रुघ्न चापले, सावन कटरे तसेच सर्व मित्र मंडळीनी अभिनंदन केले.

## शिक्षण विभाग तिरोडाने घेतला ध्यास गुणवत्तेचा

**तिरोडा:-** शिक्षण विभाग तिरोडाचे गटशिक्षणाधिकारी विनोद चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली खराशी पॅटर्न मार्गदर्शनपर कार्यशाळा दिनांक ९ सप्टेंबर २०२३ ला गिरजाबाई हायस्कूल तिरोडा येथे संपन्न झाली.

कार्यशाळेला तिरोडा पंचायत समिती अंतर्गत दहा केंद्रातील निवडक १० उत्कृष्ट शाळांचे सरपंच, अध्यक्ष, (शाळा व्यवस्थापन समिती), केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक व सर्व शिक्षक उपस्थित होते.

कार्यशाळेला कुंताताई पटले (सभापती) अध्यक्ष म्हणून तर हुपराजजी जमईवार (उपसभापती) पंचायत समिती तिरोडा प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. विनोद चौधरी (गटशिक्षणाधिकारी), मुबारक सय्यद सर (मुख्याध्यापक ), डी. बी. साकुरे , अशोक बरईकर (शिक्षण विस्तार अधिकारी), राजलक्ष्मी तुरकर (मुख्याध्यापक), डॉ. रामप्रकाशजी पटले (सामाजिक कार्यकर्ता) उपस्थित होते.

## रहांगडाले क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्यशिक्षक गुणगौरव पुरस्काराने सन्मानित



**तिरोडा:** - तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सतोना येथील विषय शिक्षक परमानंद रहागंडाले यांना टाटा थीएटर नॅशनल सेंटर फार परफॉर्मिंग आर्ट नरिमन पॉईंट मुंबई येथे शैक्षणिक व समाजिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल प्राथमिक शिक्षक गटातून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधानसभा अध्यक्ष ॲड.राहुल नार्वेकर, शिक्षणमंत्री दिपक केसरकर, शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजीतसिंग देओल, शिक्षण आयुक्त सुरज मांढरे, आमदार कपिल पाटील, आमदार विक्रम काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिक्षणमंत्री दिपक केसरकर यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्यशिक्षक गुणगौरव पुरस्कार २०२२-२३ देऊन गुणगौरव करण्यात आला.

## प्रतापगड येथे विविध विकास कामांचे भूमिपूजन



**अर्जुनी मोरगाव:** - तालुक्यातील तिर्थक्षेत्र प्रतापगड येथे विविध विकास कामांचे भूमिपूजन जिल्हा परिषद उपाध्यक्ष तथा सभापती शिक्षण क्रीडा व आरोग्य इंजि यशवंत गणविर यांच्या शुभहस्ते, पंचायत समिती सदस्य आम्रपाली डोंगरवार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

प्रतापगड हे गोंदिया जिल्ह्यातील हिंदु मुस्लिम एकतेचे प्रतिक असलेले तिर्थक्षेत्र व पर्यटन स्थळ म्हणुन प्रसिद्ध आहे. तिर्थक्षेत्र विकास निधी व प्रादेशिक पर्यटन विकास निधी अंतर्गत शिवमंदिर परिसरात पेव्हिंग ब्लॉक बसविणे. भक्तनिवास परिसरात पेव्हिंग ब्लॉक बसविणे.हिली पायरी परिसरात पेव्हिंग ब्लॉक बसविणे. विश्रामगृह परिसरात संरक्षण भिंत बांधकाम करणे या विकास कामांचे भूमिपूजन संपन्न झाले.

यावेळी इंजि.यशवंत गणविर म्हणाले की प्रतापगड हे हिंदु मुस्लिम एकतेचे प्रतिक असलेले तिर्थक्षेत्र, या तिर्थक्षेत्राला वर्षभर लाखो भाविक दर्शनासाठी येतात.त्यांना कोणत्याही प्रकारची उणीव या तिर्थक्षेत्र स्थळी भासु नये म्हणून येथील विकास व सोयी सुविधा यांना महत्त्व देऊन विकास कामांसाठी सर्व स्तरातून निधी खेचुन आणुन विकासाला गती देऊ व सर्वांच्या सहकार्याने या तिर्थक्षेत्राला वेगळी ओळख निर्माण करु.

या भुमिपुजन सोहळ्याला सरपंच भोजराम लोगडे, पोलिस पाटील योगेश जनबंधु, ग्रामपंचायत सदस्य सुखदेव कनोजे, हर्षा राऊत, नलु हुर्रा, रेवता गहाणे, छाया डोंगरवार, गिता बावणे, ग्रामसेवक डी.जी.दरवडे, सलीम पठाण, अशोक गायकवाड, मधुकर पुस्तोडे तथा ग्रामस्थ उपस्थित होते.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबावदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# तेली समाजाने मनुस्मृती का जाळली?

विदर्भ तेली समाज महासंघ स्थापन होण्यापूर्वी तेली समाजाला हीन लेखणाऱ्या काही घटना घडल्या. त्याच्या निषेधाचे तीव्र पडसाद समाजात उमटले. त्यानंतर तेली समाज आणि इतरही काही शेतकरी-कष्टकरी असलेल्या शुद्र जाती आणि स्त्रियांबद्दल हीन लेखन केलेल्या साहित्याची चर्चा होऊ लागली. यात प्रामुख्याने मनुस्मृतीचा उल्लेख होऊ लागला. आणि हिन लेखल्या गेलेल्या समाजात एकप्रकारे अस्मिता जागृत होऊ लागली. मंडल आंदोलनातील अनेक ओबीसी संघटनांनी या बाबत परखड भूमिका घेत, धर्मग्रंथांची उघडपणे चिकित्सा मांडण्याचे धैर्य दाखवले. त्यात तेली समाज आघाडीवर होता. सर्व स्तरातून, तेली समाजाला हीन लेखणाऱ्या घटनांचा, प्रतिवाद होऊ लागला. निर्णयसागर नावाचे कॅलेंडर मुंबईवरुन प्रकाशित होत. या कॅलेंडरमधील १९९२ च्या सप्टेंबर महिन्याच्या मागच्या बाजूला शकुन-अपशकुन मथळ्याखाली ज्योतिर्विद दा. कृ. सोमण लिहतात,

"हातात तेल व पेंड घेतलेला तेली तसेच सोनार, न्हावी, गुरवीन अशी माणसे समोर येणे अशुभ समजावे."

प्रयाणकाली मांजर आडवे गेले तर २० पावले मागे यावे, तेली समोरुन येताना दिसला तर ३० पावले मागे यावे आणि विधवा समोर आली तर प्रयाण वर्ज्य करावे. अशाप्रकारे तेली समाजाला हीन लेखणाऱ्या 'निर्णयसागर ९२' कॅलेंडरची १९९२ ला जानेवारीच्या २० तारखेला होळी केली गेली. १९९३ ला तेली समाजाला हीन लेखणाऱ्या हिंदू धर्मग्रंथ मनुस्मृती व सहदेव भाडळी, या पुस्तकांवर बंदी आणण्यासाठी विदर्भ तेली समाज महासंघाचे ज्येष्ठ नेते मा. रामदास देशकर यांनी महाराष्ट्र शासनाला आत्मदहनाची नोटीस दिली. 'बहुजन समाजाच्या तेली, सोनार, न्हावी व गुरवीन या जातीबद्दल अतिशय हीन आणि बदनामीकारक मजकूर छापणाऱ्या सहदेव भाडळी व सार्थश्री मनुस्मृतीच्या संपादक मुद्रक प्रकाशकांविरुद्ध भारतीय दंड विधानाच्या कलम १५३-अ (ब) अन्वये फौजदारी खटला भरण्याची व फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ९५ अन्वये ही प्रकाशने जप्त करण्याची कारवाई करण्यात येईल, अशी घोषणा नगरविकासमंत्री श्री. अरूण गुजराती यांनी विधानसभेत केली.

आ.जयदत्त क्षीरसागर, लक्ष्मणराव ढोबळे, केशवराव धोंडगे प्रभृती २६ आमदारांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेवर मंत्र्यांनी ही माहिती दिली. या लक्षवेधीवर सत्तारुढ आणि विरोधी सदस्यांनी अतिशय तीव्र आणि संतप्त भावना व्यक्त केल्या. गोपीनाथ मुंडे, मदन बाफना, दिलीप वळसे पाटील, वल्लभ बेनके, हशु अडवाणी, लीलाधर डाके, नेताजी राजगडकर, विधानसभा उपाध्यक्ष मोरेश्वर टेंमुर्डे यांनी याप्रकरणी विशेष लक्ष घातले होते,




या लिखाणावर बंदी न आणल्यास तेली समाज समन्वय महासंघाच्या सचिवांनी नागपुरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यासमोर ३०-१२-९३ रोजी आत्मदहन करू असे पत्र शासनाला दिले होते. त्याचा उल्लेखही लक्षवेधी सूचनेत करण्यात आला होता. (पृ.४५,तेली समाजाची दशा आणि दिशा, ले. मधुकर वाघमारे) एका पंधरवड्यात मा. रामदास देशकर यांच्या आत्मदहन नोटीसीमुळे २६ आमदारांच्या लक्षवेधी सूचनेवरुन 'मनुस्मृती व सहदेव भाडळी पुस्तकावर बंदी,' याप्रकारचा विधानसभेचा ऐतिहासिक निर्णय झाला. दुसऱ्या दिवशी मनुस्मृती ग्रंथाची जवाहर विद्यार्थी गृह नागपूर येथे हजारोंच्या उपस्थितीत होळी करण्यात आली.

मनुस्मृती हा ग्रंथ नेहमीच वादग्रस्त राहिलेला आहे. जातीव्यवस्था समर्थक कौशल्याने, कसोशीने त्या ग्रंथातील मजकूर समाजमनावर बिंबवून उच्चजातवर्चस्व कायम राखत आले आहेत. मनुस्मृतीच्या समर्थकांची संस्कृती या देशात मनुची व्यवस्था अर्थात शूद्रातिशूद्रांची गुलामी कायम ठेवण्यासाठी फार प्रयत्नशील आहे. त्या व्यवस्थेचा प्रचार-प्रसार करण्यासाठी त्यांच्याकडे स्वयंसेवक आहेत. दांभिक बापू, बाबा, साधू, साध्वी, माता, अम्मा, महाराज, पंडित आहेत. प्रसार माध्यमे आहेत, या देशातील मंदिरांची मुखत्यारी त्यांच्याकडे आहे. धार्मिक संस्थांना मिळणारे सोनंनाण्याचे दान, बक्षिसे, चल-अचल संपत्ती यांच्या माध्यमातून उभी झालेली मंदिरांची गडगंज मालमत्ता त्यांच्या मुठीत आहे. त्या साधनसंपत्तीचा वापर धर्मांध शक्तीच्या सशक्तीकरणासाठी होतो, असा कितीही टाहो फोडला तरी ते जुमानत नाही. या देशात शिक्षण, शेती, दारिर्द्य, बेरोजगारी, महागाई अशा कितीतरी समस्या आहेत. देवालयाच्या संपत्तीचे राष्ट्रीयीकरण करुन, शिक्षण, शेती, आरोग्य इ.वरील आर्थिक तरतुदीत भर पडू शकते या मताला मनुचा मासा म्हणतात त्यांनी मातीत घातले. ती संपत्ती मनुची व्यवस्था जिवंत ठेवण्यासाठी राबणारे स्वयंसेवक, सनातन संस्था, राजकारण-धर्मकारण, यासाठी वापरले जाते. शुद्रातिशुद्रांना मनुस्मृतीच्या निर्देशानुसार संपत्तीचा अधिकार नाही, म्हणजे त्याचेच काटेकोर पालन नव्हे का? मनुस्मृतीच्या अनेक ओव्या माणसाला पशुपेक्षाही नीच मानणाऱ्या आहेत, अमानुष वागणूकीची दंडसंहिता आहे. जातीभेद, स्त्रीदास्य, शूद्रातिशूद्रांची गुलामी, अस्पृश्यता ह्यांचा मूलाधार मनुस्मृती आहे. म्हणूनच बाबासाहेब आंबेडकर यांनी मनुस्मृतीचे दहन करुन सर्व प्रकारच्या विषमतामूलक तत्वांना तिलांजली दिली.

आज तेली समाज अनेक क्षेत्रात प्रगती पथावर आहे. स्वातंत्र्यानंतर नव्या घटनेनुसार समता, स्वातंर्त्य, बंधुता, व्यवसाय-शिक्षणाची संधी, लोककल्याणकारी योजना, लोकशाही मूल्ये, आधुनिकीकरण यामुळे समाज बदलत आहे. तेली समाजाला यामुळे खूप लाभ झाला. अनेकांना तेली समाजाची ऐतिहासिक पार्श्वभूमी माहीत नाही. ती अपमानास्पद दशा आता नकोशी वाटते. आता कशाला जुने मुडदे उकरुन काढायचे? आता समाजात विषमता राहिलेली नाही, अशा भावना त्यामागे असतात. काही राजकीय पक्षाची भावंडं एकीकडे तेली समाजाची गठ्ठा मते झोळीत पाडून, मनुस्मृतीवर आधारित विचारांच्या पक्ष, संघटनांच्या पालखीचे भोई बनून मिळवलेले दुय्यम मोठेपण मिरवत असतात. त्यामुळे कसायाच्या दावणीला बकरा नेऊन बांधल्यासमान समाजाची अवस्था होते. ज्यांनी समाजाला जनावरांपेक्षाही नीच ठरवले, त्यांच्या ओंजळीने पाणी पिणे म्हणजे आत्मघातकीपणाच नव्हे का? ही गुलाम मानसिकता बदलणे जरुरीचे आहे, यासाठीचा पवित्रा म्हणजे गुलामी लादणारी मनुस्मृती धिक्कारणे होय. तेली समाजाने मनुस्मृतीचे दहन करणे ही एक घटना ऐतिहासिक ठरते. मनुस्मृती दहनामुळे तेली समाजाच्या मागासपणाची चर्चा झाली. समाजातील जाणती भावंडं तेली समाजाचे मागासलेपण, दुय्यम स्थान घालवण्यासाठी परिवर्तनाच्या दिशेने समाजाला कसे नेता येईल? यासंबंधी गांभिर्याने विचार करू लागले. तेली समाज ओबीसी प्रवर्गात मोडत असल्याने ओबीसी आरक्षणाच्या लढाईत तेली समाजाचा सहभाग वाढत गेला. मनुस्मृती दहन या घटनेनंतर विदर्भ तेली समाज महासंघाचे कार्य खूप वेगाने विदर्भातील कानाकोपऱ्यात पसरू लागले. तेली समाजात एक प्रकारे अस्मिता जागृत होऊन, राजकीय शैक्षणिक, सामाजिक, व्यावसायिक क्षेत्रात आगेकूच झालेली दिसून येईल. तेली समाजाला पशुपेक्षाही हीन समजणाऱ्या मनुस्मृतीचे दहन करुन तेली समाजाला आत्मभान दिले. समाजमनावर भेदाभेदाचे विषमतेचे संस्कार खोलवर रुजलेले असल्याने ही लढाई निरंतर चालू ठेवावी लागणार आहे, अनेकदा मनुस्मृतीचे दहन करुन, त्या घटनांची कारणमीमांसा करुन, स्मरण करुन हा लढा जिवंत ठेवणे अनिवार्य आहे.

**अनुज हुलके**

# राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियानात नाविन्यपूर्ण संकल्पना राबवा-जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे

## २० ऑगस्ट ते २ ऑक्टोबर अभियान कृती कालावधी



**गोंदिया :** राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान व स्पर्धा २०२३-२४ मध्ये सर्व शासकीय विभागाने सहभागी होणे अपेक्षित आहे. अभियान व स्पर्धेशी संबंधित सर्व अनुषंगिक बाबींवर कार्यवाही करण्यासाठी शासनाने पोर्टल विकसित केले आहे. जिल्ह्यातील सर्व शासकीय विभागांनी नाविन्यपूर्ण कल्पना राबवून राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियानात सहभागी व्हावे, अशा सूचना जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी केल्या.

सदर अभियानाचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी ते बोलत होते. या संबंधीचे प्रस्ताव व आराखडा तातडीने सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व विभाग प्रमुखांना दिले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपत्रे, अधिष्ठाता डॉ.कुसुमाकर घोरपडे, सर्व उपविभागीय अधिकारी व गटविकास अधिकारी यांचेसह सर्व विभागाचे कार्यालय प्रमुख उपस्थित होते.

राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान कृती कालावधी २० ऑगस्ट ते २ ऑक्टोबर २०२३ असा आहे. स्पर्धेसाठी विचारात घ्यावयाचा कालावधी मागील २० ऑगस्ट २०२२ ते १९ ऑगस्ट २०२३ असा आहे. प्रशासकीय सुधारणेविषयी प्रस्ताव व कल्पना यासाठी मात्र कालावधीची अट नसेल असे त्यांनी नमूद केले.

या अभियानांतर्गत शासनाने सात कार्यक्षेत्र निश्चित केली आहेत. कार्यालयीन व्यवस्थापनामध्ये आधुनिक संकल्पना व व्यवस्थापन पद्धतीचा अवलंब, सेवांची गुणवत्ता/दर्जा यामधील वाढ व उपक्रमांची परिणामकारकता, लोकाभिमुखता, ई-गव्हर्नस, संसाधनांचा पर्याप्त व प्रभावी वापर, तंटा/ तक्रार मुक्त कार्यालय, नाविन्यपूर्ण व पथदर्शी स्वरूपाच्या संकल्पना, प्रयोग व उपक्रम ही ती सात कार्यक्षेत्र आहेत असे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

या स्पर्धेच्या निमित्याने जिल्ह्यातील सर्व यंत्रणेच्या कारभारात अधिक गतिमानता आणण्याच्या दृष्टीने चालना मिळणार आहे. त्याअनुषंगाने जिल्ह्यातील सर्व विभाग प्रमुख व खातेप्रमुख यांनी आपल्या खात्याच्या कारभार जास्तीत जास्त लोकाभिमुख तसेच तत्पर व कार्यक्षम होण्याच्या दृष्टीने स्पर्धेच्या कालावधीत व त्यानंतरच्या कालावधीत प्रयत्न करावा. सभेच्या निमित्ताने आपल्या खात्यातील सर्व अधिकारी व सेवकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण करून उद्देश साध्य करण्यासाठी वातावरण निर्माण करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

स्पर्धेसाठी https://pragatiabhiyan.maharashtra.gov.in/ या पोर्टलवर जावून आपली नोंदणी करणे अनिवार्य राहिल. आपले युजर नेम व पासवर्ड जतन करून ठेवण्यात यावे. शासनाच्या स्पर्धेच्या अनुषंगाने आपल्या खात्यामध्ये कोणत्या प्रकारे कार्यवाही करणार आहात याचा तपशीलवार आराखडा सादर करणे अपेक्षित आहे. त्यानुसार आपल्या विभागाकडील तयार केलेल्या आराखड्याची प्रत जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करणे अनिवार्य राहिल असे ते म्हणाले.

स्पर्धेच्या तयारीसाठी कालावधी अत्यंत कमी असल्यामुळे आपल्या विभागाकडील आराखडा सत्वर तयार करण्यात यावा. शासनाच्या या स्पर्धे संबंधीचा ०३ फेब्रुवारी २०२१ चा सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय अभ्यासावा व गोंदिया जिल्ह्यातील जास्तीत जास्त कार्यालयांनी या अभियानांतर्गत स्पर्धेत सहभागी व्हावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

प्रशासन लोकाभिमुख करणे, त्यात निर्णयक्षमता आणणे आणि सर्वांच्या सहकार्यातून उत्तम प्रशासन कार्यान्वित करणे हा या अभियानाचा उद्देश आहे. या अभियानांतर्गत घ्यावयाच्या स्पर्धेच्या निवड प्रक्रियेसाठी ४ स्तरांवर अनुक्रमे तालुका स्तर, जिल्हा स्तर, विभागीय स्तर व राज्यस्तर अशा समित्या गठीत करण्यात आल्या आहेत. या अभियानांतर्गत अर्ज स्विकारण्यासाठी राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा पोर्टल विकसीत करण्यात आले असून सदर संकेतस्थळाची लिंक https://pragatiabhiyan.maharashtra.gov.in/ अशी आहे. सदर अभियानांतर्गत घेण्यात येणाऱ्या स्पर्धेसाठी १६ ते ३१ ऑक्टोंबर २०२३ दरम्यान ऑनलाईन प्रस्ताव सादर करावयाचे आहे. आपल्या कार्यालयाच्या नाविन्यपूर्ण संकल्पना सूचविण्यासाठी तालुका स्तर प्रथम पारितोषिक ३० हजार रुपये, द्वितीय २० हजार रुपये व तृतीय १० हजार रुपये. जिल्हा स्तर प्रथम पारितोषिक ७५ हजार रुपये, द्वितीय ५० हजार रुपये व तृतीय २५ हजार रुपये. विभागीय स्तर प्रथम पारितोषिक १ लाख ५० हजार रुपये, द्वितीय १ लाख रुपये व तृतीय ५० हजार रुपये. राज्यस्तर प्रथम पारितोषिक १० लाख रुपये, द्वितीय ६ लाख रुपये व तृतीय ४ लाख रुपये अशाप्रकारे पारितोषिक देण्यात येणार आहे. गोंदिया जिल्ह्यातील जास्तीत जास्त कार्यालयांनी या अभियानांतर्गत स्पर्धेत सहभागी होवून आपल्या विभागातील नाविण्यपूर्ण संकल्पना सादर करावे, असे निवासी उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपत्रे यांनी सांगितले.

# ११ लाखाचे दागिणे चोरणाऱ्या चोरट्यास मध्यप्रदेशातून अटक



**गोंदिया:** शहरातील हॉटेल सेंटर पाईट येथे आठवडाभर थांबून गोंदिया शहराची रेकी करणाऱ्याने आलमारीचे लॉक दुरुस्त करण्याच्या नावावर एका घरात प्रवेश केला. त्या घरातील तब्बल २२० ग्रॅम सोने पळविले होते. आरोपीजवळून एक मोबाईल हँडसेट व १७३.५ ग्रॅम सोन्याचे दागिणे किंमत ११ लाख ६८ हजार ६०० रुपयांचा माल जप्त करण्यात आला आहे.

त्या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी त्या आरोपीला ९ ऑगस्ट रोजी अटक करण्यात आली आहे. त्याच्या जवळून ११ लाख ६८ हजार रुपयांचे सोन्याचे दागिणे व इतर साहित्य हस्तगत करण्यात आले आहे.

गोंदिया गोंदिया पोलीस ठाण्यांतर्गत येणाऱ्या ममता खटवाणी रा. बाजपेयी वॉर्ड, सिव्हील लाईन, गोंदिया यांच्या घरी आलमारीचे लॉक दुरुस्त करण्याच्या नावावर २१ ऑगस्ट २०२३ त्यांच्या घरामध्ये गेला. त्याच्या जवळून २२० ग्रॅम सोन्याचे दागिणे चोरुन नेले. या संदर्भात गोंदिया शहर पोलिसांनी भादंविच्या कलम ३८० अन्वये दाखल करण्यात आला. पोलीस अधीक्षक निखील पिंगळे, अपर पोलीस अधीक्षक अशोक बनकर यांनी गोंदिया जिल्ह्यामध्ये आलमारीचे लॉंक दुरुस्ती करणारे, चोरी, घरफोडी, मोटार सायकल चोरी, जबरी चोरीचे गुन्हे करणारे गुन्हेगारांचा शोध घेण्याचे निर्देश दिले. वर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश लबडे यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी माहिती घेत गुजरातच्या सुरज जिल्ह्यातील उधना बापुनगर गुरुबिर धिरसिंग सिंग चव्हाण (३१) याला मध्यप्रदेशच्या बडवाणी जिल्ह्यातील कातिया येथे अटक केले. त्याने गोंदियातून ही चोरी केल्याची कबुली दिली. ही कारवाई पोलीस निरीक्षक दिनेश लबडे यांच्या नेतृत्वात सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय शिंदे, पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने, महिला पोलीस उपनिरीक्षक वनिता सायकर, पोलीस हवालदार राजेंद्र मिश्रा, भुवनलाल देशमुख, महेश मेहर, इंद्रजीत बिसेन, चित्तरंजन कोडापे, चेतन पटले, पोलीस शिपाई संतोष केदार, हंसराज भांडारकर, चालक पोलीस हवालदार लक्ष्मण बंजार, घनश्याम कुंभलवार, सायबर सेलचे पोलीस हवालदार दिक्षीत दमाहे, धनंजय शेंडे, संजय मारवाडे यांनी केली आहे.

गोंदियाच्या हॉटेल सेंटर पाईट येथे खोली घेऊन वाहस्तव्यास होता आरोपी गुरुबिर धिरसिंग सिंग चव्हाण (३१) हा गोंदियाच्या हॉटेल सेंट्रल पॉईट श्री टॉकीज रोड गोंदिया येथे थांबलेला होतो. १४ ते २१ ऑगस्ट दरम्यान त्याने गोंदियात मुक्काम ठोकून रेकी केली. संधी साधत त्याने चोरी केली होती.

या गुन्ह्यातील आरोपीला पकडण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी तीन पथके तयार केली होती. आरोपी हा रेल्वे स्टेशन जवळील हॉटेल सेंटर पॉईट येथे १४ ते २१ ऑगस्टपर्यंत राहिला. गुन्हा करुन तुमसर रेल्वे स्टेशन येथे गेल्याचे पोलिसांना सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसले. तुमसर रेल्वे स्टेशन येथुन तो सुरत येथे गेल्याचे निष्पन्न झाले. आरोपीने आपल्यापर्यंत पोलीस पोहचू नयेत म्हणून वारंवार आपला मार्ग बदलून पोलिसांची दिशाभूल केली. त्याने आतापर्यंत १४ सीम कार्ड व मोबाईल बदलल्याचे तांत्रीक विश्लेषणाद्वारे पुढे आले आहे.

### दोन वर्षाचा तुरुंगवास भोगलेला गुन्हेगार

**आरोपी गुरुबिर धिरसिंग सिंग चव्हाण (३१) याने राजस्थान, दिल्ली, दुर्ग छत्तीसगड येथे अशाच प्रकारचे गुन्हे केल्याची माहिती पोलिसांना दिली. दिल्ली येथील गुन्हयामध्ये २ वर्ष तुरुंगवास भोगून तो बाहेर आला होता. त्याला सन २०२१ मध्ये नंदनवन पोलीस नागपुर यांनी देखील अटक केली होती.**

### कुलूप चाबी बनविण्याच्या नावावर करतो चोरी

**आरोपी हा आपल्या घरापासून दूर बाहेरील राज्यामध्ये जातो. जेथे गुन्हा करायचा आहे तेथे वास्तव्य करुन एक जुनी सायकल विकत घेतो. कुलुप व चाबी बनवतो असे आरेडत गल्लोगल्लीत फिरुन रेखी करुन कुलुप व चाबी बनविण्यासाठी घरात प्रवेश करतो. घरातील कुटुंबातील सदस्यांचे लक्ष विचलित करुन कपाटातील सोने किंवा मौल्यवान वस्तु चोरुन पलायन करतो.**

# छिपीयातून काँग्रेसच्या जनसंवाद यात्रेला सुरुवात



**गोंदिया :** महाराष्ट्र काँग्रेस कमेटीच्या निर्देशानुसार राज्य सद्या जनसंवाद यात्रा सुरू आहे. त्याच अंतर्गत गोंदिया जिल्हा काँग्रेस कमेटीच्या वतीने जिल्ह्यातही या यात्रेचे आयोजन होत आहे. त्याच अनुषंगाने गोंदिया विधानसभा क्षेत्रात जिल्हा काँग्रेस कमेटीचे उपाध्यक्ष अशोक गुप्ता यांच्या मार्गदर्शनात या यात्रेला सुरुवात झाली आहे. तालुक्यातील छिपीया येथून या यात्रेला प्रारंभ झाला असून क्षेत्रातील संपुर्ण गावात तसेच शहरात ही यात्रा जणार असून केंद्र शासनाच्या दुटप्पी धोरनांपाढाही वाचणार आहे.

काँग्रेस कमेटीच्या वतीने आयोजित ही यात्रा ५ सप्टेंबरपासून सुरू झाली असून १२ सप्टेंबरपर्यंत चालली. केंद्र शासनाने मागील ९ वर्षात बेरोजगारी, महागाई तर इतर महत्वाच्या मुद्यांवर दुर्लक्ष केल्याने सर्वसामान्य नागरिकांना हरिमोड झाला आहे. त्यातच राज्य शासनही त्याच धतीवर कार्य करीत असल्याने अनेक समस्या आवासून उभ्या आहेत. या समस्यांना वाचा फोडण्यासाठी या यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. गोंदिया तालुक्यातील छिपीया येथून या यात्रेला सुरुवात झाली असून ही यात्रा चिरामनटोला, परसवाडा, कोचेवाही, बनाथर, धामनगाव, सतोना, जिरुटोला, बाजारटोला, काटी आदी गावात या यात्रेचे जनसंवाद साधला आहे. काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष अशोक (गप्पू) गुप्त यांच्या नेतृत्वात प्रदेश सचिव अमर वराडे, निलम हलमारे, तालुका अध्यक्ष सुर्यप्रकाश भगत, शहर अध्यक्ष जहीर अहमद, कृउबास उपसभापती राजकुमार पटले, ॲड. योगेश अग्रवाल, ओमप्रकाश भक्तीवर्ती, निवेश मिश्रा, डॉ. प्रकाश देवाधारी, आशिष चव्हाण, सचिन मेश्राम, विजय बहेकार, धन्नालाल नागरिकर, सुरेश चौरागडे, वसिम शेख, मनिष लांजेवार, निलेश लांजेवार, आनंद जतपेले, विशाल कटरे, दिपक बिसेन, दिनेश कोहळे, लखेश्वर नागफासे, अंकित चव्हाण, अंकित नागफासे, भागवत बाहे, उमेश हर्षी, लक्की रहांगडाले, सुरबंशी न्यायखरे, आकाश उके, धनराज शहारे, विशाल कटरे, लक्की पटले, कपील रंगारी, सिद्धार्थ पंधरे, राजेश भादुपोते, राहुल मेश्राम, ताराचंद माने, मुकेश पाटील, आनंद लांजेवार, आशिष उपवंशी, शिवा जतपेले, अशोक कावळे, योगेश भेलावे, नरेंद्र चिखलोंडे, आशिफ सैय्यद, पंकज पिल्ले, मुकेश येडे, विक्की नागफासे, दिनेश चौधरी, कुंदन मानकर यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते यात्रेत सहभागी झाले.

# चार शाळाबाह्य मुलांचा घेतला शोध

**मुंडीकोटा:** जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा मुंडीकोटा येथे शाळाबाह्य, स्थलांतरीत अनियमित बालकांचे सर्वेक्षण तसेच नवभारत सारक्षता कार्यक्रम १७ ते ३१ ऑगस्ट या कालावधीत घेण्यात आला. या अंतर्गत तिरोडा तालुक्यातील एमजीनगर परिसरात शाळाबाह्य ४ बालकांचा शोध गटशिक्षणाधिकारी व अधिकाऱ्यांनी घेतला. या बालकांना मुंडीकोटा येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत दाखल करण्यात आले. तिरोडा तालुक्यात मिशनमोड अंतर्गत शाळाबाह्य, स्थांतरीत, अनियमित बालकांचे सर्वेक्षन २८ ते ३१ ऑगस्ट या कालावधीत करण्यात आले. या निमित्ताने जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा मुंडीकोटा व एनजीनगर वस्ती येथे गटशिक्षणाकारी विनोद चौधरी, वरिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी डी.बी.साकुरे, बीआसी गटमसन्यक ब्रजेश मिश्रा, बालरक्षक तालुका समन्यक डी.बी.हाडे, मुख्यापक एम.बी.चौधरी, तालुका बालरक्षक प्रतिनिधी संतोष पारधी यांनी शाळाबाह्य मुलांचा शोध घेतला. दरम्यान मिशनमोड पाहणीत एमजीनगर परिसरात प्राची बिदोसिंग शेंडे (वय ७), रोमेट सरमा कांबळे (वय ८), प्रवित्रा शक्ती कांबळे (वय ८) व आशिष दिलीप उमे (वय १०) अशा एकुण ४ बालके शाळाबाह्य मुले आढळून आली.

# महाविजयाच्या रथाचे सारथी बना-डॉ.उपेंद्र कोठेकर



**अर्जुनी मोरगाव :-** आगामी काळ निवडणुकांचा आहे. कार्यकर्ता पार्टीचा कणा आहे. प्रत्येकाने आपले कर्तव्य सिद्ध करण्याची वेळ आली आहे. ज्याप्रमाणे भगवान श्रीकृष्ण द्वारकेचे राजा असूनही पांडवांचे सार्थी बनले आणि कौरवांच्या विरुद्ध पांडवांच्या विजयाचा संकल्प पूर्ण केला. तीच वेळ राष्ट्रवर आली आहे. या नऊ वर्षात देशात प्रत्येक क्षेत्रात, समाज जीवनात मोठे क्रांतिकारी बदल झाले. मोदींच्या नेतृत्वाने विरोधकांचे नामोहरण झाले. या कौरवांच्या विरोधात प्रत्येक कार्यकर्त्यांने महाविजयाच्या रथाचा सारथी म्हणून देशसेवा करण्यासाठी सज्ज होण्याचे आवाहन विदर्भ संघटन मंत्री डॉ.उपेंद्र कोठेकर यांनी केले.

ते नवेगाव बांध येथील बालाजी राईस मिल येथे आयोजित बूथ सशक्तिकरण कार्यशाळेचे मार्गदर्शक म्हणून बोलत होते. माजी मंत्री राजकुमार बडोले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या एक दिवशी कार्यशाळा शिबिरात जिल्हाध्यक्ष येसूलाल उपराडे, जिल्हा समन्वयक वीरेंद्र अंजणकर, जि. प. सदस्य लायकराम भेंडारकर, जि.प.सदस्या रचनाताई गहाणे, तालुकाध्यक्ष विजय कापगते, अशोक लंजे, रत्नदीप दहिवले, दीपक कदम प्रामुख्याने उपस्थित होते.यावेळी बडोले यांनी भाजपच्या काळात सर्वाधिक विकासाची कामे झाली. धनाला बोनस, मालगुजारी तलावांचे दुरुस्तीकरण, वर्ग दोन च्या जमिनीवर वर्ग एक, वन हक्काची पट्टे, ११ केव्हीचे सबस्टेशन, शेतकऱ्यांना वीज सुविधा, दवाखाने, क्षेत्रातील ८० टक्के रस्ते भाजपाने केले. तांडा वस्ती, मच्छीमारांसाठी योजना,अल्पसंख्यांकांच्या विकासाच्या योजना भाजपने तयार केल्या. एससी, एसटी आणि ओबीसी करता कल्याणकारी योजना आखल्या. मात्र विरोधक या सर्वांना भ्रमित करतात. या सर्व योजना घेऊन आपण जनतेपर्यंत जावे असे आवाहन केले. या कार्यशाळेत उपस्थितांनी अनेक विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक लायकराम भेंडारकर, संचालन शालिंदर, कापगते आणि आभार चेतन वडगाये यांनी केले.

## ग्राम पंचायत कार्यालय सातगाव, पचायत समिती सालेकसा जि.गोंदिया

ग्रामपंचायत सातगाव, पंचायत समिती सालेकसा जि.गोंदिया जिल्हा परिषद येथे विविध योजनेंतर्गत विवरणातील कामाचे बांधकामाची निविदा बांधकाम विभागाकडे यथायोग्य श्रेणीत पंजीबद्ध असलेल्या कंत्राटदाराकडून शेकडावार ऑफलाईन पद्धतीने मागवत आहेत.

### निविदा सुचना क्र.१ (पहिली वेळ सन २०२३-२०२४)

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित किंमत | निविदेसोबत भरावयाची रक्कम |
|---|---|---|---|
| १ | प्रोवायडिंग एंड स्प्रेडिंग मुरूम | ८०,००० | ८००/- |
| २ | प्रोवायडिंग चैन लिंक फेन्सींग आंगणवाडी आणि समाजमंदिर | ५०,००० | ५००/- |
| ३ | शौचालय बांधकाम (जि.प. शाळा सातगांव) | २,००,००० | २०००/- |
| ४ | सौंदर्यीकरण (डॉ.बाबासाहेब) आंबेडकर स्मारक सातगांव) | ५०,००० | ५००/- |
| ५ | प्रोवायडिंग एंड फिक्सींग पेव्हींग ब्लॉक (पाणीटंकी साकरीटोला) | २,०१,७०२ | २०००/- |
| | निविदा प्रकाशित दिनांक | दिनांक १२/०९/२०२३ | |
| | कोऱ्या निविदा मिळण्याचा दिनांक | दिनांक १३/०९/२०२३ सकाळी ११.०० वाजे पासून | |
| | निविदा दाखल करण्याची सुरुवाती दिनांक | दिनांक १३/०९/२०२३ पासून | |
| | निविदा दाखल करण्याचा अंतिम दिनांक | दिनांक २१/०९/२०२३ दु.०२.०० वाजे पर्यंत | |
| | निविदा उघडण्याचा दिनांक | दिनांक २१/०९/२०२३ दु.०३.०० वाजे (शक्य झाल्यास) | |


(**टिप:-** निविदा पत्रकातील सविस्तर माहिती ग्राम पंचायत कार्यालय सातगाव येथे कार्यालयीन वेळेत मिळेल.

**ग्रामसेवक**
ग्राम पंचायत सातगाव

**सरपंच**
ग्राम पंचायत सातगाव

# ओबीसीमध्ये मराठ्यांना आरक्षण नको

## ओबीसी संघर्ष कृती समितीचे निवेदन



**गोंदिया:-** मराठ्यांचे ओबीसी करण करू नये, राज्य, सरकारने आंदोलनाच्या दबावाखाली मराठ्यांना कुणबी जातीचे दाखले दिल्यास व ओबीसीतून आरक्षण देण्याचा प्रयत्न केल्यास तो ओबीसीवर अन्याय होईल अर्थात मराठा समाजाला आरक्षण देण्याचा विरोध नाही घटनादुरुस्ती करुन त्यांना ओबीसी प्रवर्ग वगळून स्वतंत्र प्रवर्ग तयार करुन आरक्षण द्यावे अशी मागणी ओबीसी संघर्ष कृती समिती गोंदियाच्यावतीने करण्यात आली आहे.

ओबीसी संघर्ष कृती समितीच्यावतीने जिल्हाधिकारी मार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन पाठवून ओबीसीमध्ये मराठयाच्या समावेशाला विरोध करण्यात आलला आहे. निवेदन देतेवेळी ओबीसी संघर्ष कृती समितीचे अध्यक्ष बबलू कटरे, अमर वराडे, सोनु कुथे, कैलास भेलावे, एस.यु.वंजारी, तिर्थराज उके, जिल्हा परिषद सदस्य सौ.विमल कटरे, वंदना काळे, काँग्रेस ओबीसी आघाडीचे जिल्हाध्यक्ष जितेंद्र कटरे, राजु काळे, राजीव ठकरेले, माधुरी भेलावे आर्दी उपस्थित होते.

## ग्रामपंचायत कार्यालय तुकूमनारायण

### पंचायत समिती अर्जुनी,मोर.,जि.प.गोंदिया

### जाहीर निविदा सुचना क्र.१ (पहिली वेळ)२०२३-२४

या सुचनेद्वारे सर्व इच्छुक साहित्य पुरवठादारांना सूचित करण्यात येते की,ग्रामपंचायत तुकूमनारायण येथे मासिक सभा दिनांक ११/०८/२०२३ठराव क्रमांक९/१नुसार आमदार निधी मा.मनोहर चंद्रिकापुरे ४५/१५-००१२/५३ योजना अंतर्गत मौजा गवर्रा येथे भगवान बिरसा मुंडा परिसरात वाचनालय बांधकाम करणे,मौजा गवर्रा येथे भगवान बिरसा मुंडा स्मारकाजवळ सभामंडप बांधकाम करणे तसेच ग्रामपंचायत करीता विविध बांधकाम करणेकरीता लागणारे साहित्य बांधकामाच्या जागेवर पोहचते दराने मोहरबंद दोन लिफापा पध्दतीने नोंदणीकृत साहित्य पुरवठादाराकडून दरपत्रक मागविण्यात येत आहे.निविदा फार्म दिनांक १३/०९/२०२३ ते २०/०९/२०२३ पर्यंत ग्रामपंचायत कार्यालय येथे विक्रीकरीता उपलब्ध आहेत.ग्रामपंचायतीच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून कंत्राटदारांनी आपली निविदा दिनांक २०/०९/२०२३ रोजी दुपारी २.००वाजेपर्यंत सादर करावे.शक्य झाल्यास दरपत्रक दिनांक.२१/०९/२०२३ रोजी दुपारी २.०० वाजता ग्राममपंचायत कार्यालय येथे उघडण्यात येईल.

**अटी व शर्ती:-**१)पुरवठादार महाराष्ट्र दुकान व आस्थापना अधिनियम १९४८ अन्वये पंजीकृत असणे आवश्यक आहे.२)वरिल ISI साहित्य कंपनीचे असणे आवश्यक आहे.३)दरपत्रक संपुर्ण करासहीत दर्शविण्यात यावे.४)GSTसर्टिफिकेट आवश्यक आहे.५)साहित्य ग्रामपंचायतच्या आवश्यकतेनुसार मागणी करण्यात येईल.६)ग्रा.प.निधी उपलब्धतेनसार पेमेंट देण्यात येईल.७)बांधकाम साहित्य बांधकामाच्या जागेवर पोहचते करावे लागेल.८)साहित्याची गॅरंटी/वॉरंटी देणे आवश्यक राहील.९)दरपत्रक मंजुर झाल्यास १०० च्या स्टॅम्पपेपरवर करारनामा करुन द्यावे लागेल.१०)कोणतेही कारण न दर्शविता दरपत्रक मंजुर/नामंजुर करण्याचा अधिकार सरपंच/ग्रामसेवक तुकूमनारायण कडे राखुन ठेवण्यात आलेले आहे.११)बांधकाम साहित्य यादी ग्रामपंचायत नोटीस बोर्डला प्रसिद्ध करण्यात आली आहे.

**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत तुकूमनारायण**

**सरपंच,**
**ग्रामपंचायत तुकूमनारायण**

## ग्रामपंचायत कार्यालय तुकूमनारायण, पंचायत समिती अर्जुनी मोर.,जि.प.गोंदिया

### जाहीर निविदा सुचना (पहिली वेळ)

दिनांक :१३/०९/२०२३

ग्रामपंचायत कार्यालय तुकूमनारायण,पंचायत समिती अर्जुनी/मोर,जिल्हा परिषद गोंदिया अंतर्गत १५ वा वित्त आयोग निधी अंतर्गत नियोजन वर्ष २०२२-०२३ या वर्षाकरीता खालीलप्रमाणे कामाकरीता नोंदणीकृत कंत्राटधारकाकडून व्दिलिफापा (दोन) पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | नमुना-७ निविदा फार्म किंमत | निविदासोबत भरावयाची अनामत रक्कम १% | निविदास्विकृत झाल्यास सुरक्षा ठेव २% | बिलातून कपात कपात करण्यात येणारी ठेव २% | काम पूर्ण करण्याचा कालावधी | कंत्राटदाराचे वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | उमरपायली येथे अंगणवाडी दुरुस्ती व रंगरगोंटी करणे | ७००००/- | ५००/- | ७५०/- | १४००/- | १४००/- | ३ महिने | योग्य त्या वर्गवारीत |
| २ | जि.प.शाळा गवर्रा आवारभिंत बांधकाम करणे | १४००००/- | ५००/- | १४००/- | २८००/- | २८००/- | ३ महिने | योग्य त्या वर्गवारीत |
| ३ | मौजा तुकूमनारायण येथे पाणी टाकी दुरुस्ती व रंगरंगोटी करणे | २५००००/- | ५००/- | २५००/- | ५०००/- | ५०००/- | ३ महिने | योग्य त्या वर्गवारीत |

सदर कामे करण्याकरीता दोन लिफापा पद्धतीने अनुसुची ब-०१प्रमााणे नोंदणीकृत कंत्राटदाराकडून निविदा मागविण्यात येत आहे.तरी निविदा अर्ज फार्म ग्रामपंचायत येथे दिनांक १३/०९/२०२३ ते २०/०९/२०२३ पर्यंत विक्रीकरीता उपलब्ध आहेत.नमुदकेल्याप्रमाणे अटि व शर्तीच्या अधिन राहून कंत्राटदारांनी आपली निविदा सादर करावी.इच्छुक कंत्राटदारांनी आपल्या फर्मची सर्व दस्तावेज व दरपत्रक अटी व शर्तीप्रमाणे निर्धारित वेळेत ग्रामपंचायत कार्यालय करांडली येथे दिनांक १३/०९/२०२३ ते २०/०९/२०२३ ला ठिक सायं.५.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावित.निविदा दि.२१/०९/२०२३ रोजी दुपारी १२.०० वाजता(शक्य झाल्यास)निविदा धारकांच्या समक्ष उघडण्यात येईल.निविदा मंजूर,नामंजूर करण्याचा अधिकार सरपंच व ग्रामसेवक यांच्याकडे राखून ठेवला आहे.काही अडचण असल्यास ग्रामपंचायत कार्यालयास संपर्क साधावे.

**निविदेचा वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा प्रसिध्दी | दिनांकः-१३/०९/२०२३ |
| २ | निविदा ऑफलाईन भरणा दिनांक | दिनांकः-१३/०९/२०२३ ते २०/०९/२०२३ |
| ३ | निविदा प्रपत्र व फि/बयाणा रक्कम निविदा कागदपत्रे कार्यालयात जमा करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | दिनांकः-१३/०९/२०२३ ते २०/०९/२०२३ ला सायकांळी ५.०० वाजतापर्यंत |
| ४ | ऑफलाईन निविदा उघडणे(शक्य झाल्यास) | सरपंच/ग्रामसेवक ग्रा.प.तुकूमनारायण यांचे कक्षात संबधित निविदाधारकांचे समक्ष दि.२१/०९/२०२३ दुपारी १२.००वाजता |
| ५ | निविदा शुल्क व अमानतर रक्कम भरणा करणे | ग्रा.प.कार्या.तुकूमनारायण खाते क्रमांक ९७७९०१०००१४४२७ बँकेचे नाव बँक ऑफ बडोदा शाखा अर्जुनी मोर.ifsc code-BARBBODBARJN या खातेवर RTGS/NEFT/Direct Transfer किंवा ग्रा.पं.तुकूमनारायण येथे रोखीने भरणा करावे. |

**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत तुकूमनारायण**

**सरपंच,**
**ग्रामपंचायत तुकूमनारायण**

# शहीद जवानावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

## अंत्ययात्रेत हजारोंची गर्दी: पुष्पवर्षाव करुन वीर सुरेश नागपुरे अमर रहेच्या घोषणा





**गोंदिया:** देशाच्या सीमांचे रक्षण करत असताना लेह लदाख येथे गोंदियाच्या वीर सुपुत्राला ७ सप्टेंबर रोजी दुपारी चार वाजताच्या सुमारास वीर स्मरण आले. शनिवारी सकाळी त्यंचे पार्थिव गोंदियात पोहोचले. सकाळी ८ वाजतापासून शहरातील राणी अवंतीबाई चौकातून तयांचे पार्थिक शहरातील प्रमुख मार्गावरुन नेण्यात आले. दरम्यान शहरवासींनी त्यांना अखेरच निरोप देण्याकरिता हजारोंच्या संख्येत गर्दी करत पुष्पवर्षाव कुेला. ठिकठिकाणी त्यांना श्रद्धांजली देण्यात आली. वीर सुरेश नागपुरे अमर रहे, अशा घोषणा देण्यात आल्या. शनिवारी दुपरी ३ वाजताच्या सुमारास त्यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.

शहरानजीक असलेल्या तुमखेडा खुर्द येथील सुरेश हुकलाल नागपुरे (३४) हे भारतीय सैन्य दलात कार्यरत होते. लेह लडाख येथे कर्तव्यावह असताना त्यांना ६ सप्टेंबर रोजी दुपारी ४ वाजताच्या सुमारास हृदयाघात झाला. त्यांना तातडीने रुग्णालयात नेण्यात आले. मात्र त्यांचा मृत्यू झाला. ही बातमी पसरताच तुमखेडासह गोंदिया शहर आणि जिल्ह्यात शोककळा पसरली. त्यांचा मृतदेह शनिवारी सकाळी तुमसर–तिरोडा मार्गे गोंदियात आणण्यात आला. यावेळी तुमसर, तिरोडा आणि रस्त्यावरील इतर गावात त्यांचे अंत्यदर्शन घेण्याकरिता मोठ्या संख्येने नागरिक गोळा झाले होते. शनिवारी सकाळी ८ वाजताच्या सुमारास शहरातील राणी अवंतीबाई चौकातून अंत्ययात्रा काढण्यात आली. शहरात त्यांचे अंत्यदर्शन घेण्याकरिता नागरिक ठिकठिकाणी चौकात एकत्र झाले होते. रस्त्यावरुन फुलांचा सडा टाकण्यात आला होता. वीर सुरेश नागपुरे अमर रहे, असे होर्डिंग लावण्यात आले होते. अंत्ययात्रेत हजारोंच्या संख्येने तरुण, नागरिक, वृद्ध आणि महिलादेखील सहभागी झाले होते. सकाळी पोलीस अधीक्षक निखील पिंगळे यांनी त्यांचे अंत्यदर्शन घेतले. तसेच आमदार विनोद अग्रवाल यांनी जयस्तंभ चौकातील प्रशासकीय भवनाजवळ सुरेश नागपुरे यांच्या पार्थिवाचे दर्शन घेऊन त्यांना नमन केले. माजी आमदार राजेंद्र जैन यांनी तुमखेडा येथे जावून अंत्यदर्शन घेतले. फुलचूर येथे देखील सकाळी ७ वाजतापासून गोळा झालेल्या नागरिकांनी पार्थिक येताच नागरिकांनी सुरेश नागपुरे यांचा पार्थिक घेवून जाणाऱ्या वाहनावर पुष्पवर्षाव करुन जयघोष केला.

### तुमखेडा येथे अंत्यसंस्कार

**सुरेश नागपुरे यांचा मृतदेह भारतीय सैन्यदलाच्या वाहनातून शहरभरातील मुख्य रस्त्यांवरुन नेत अंत्ययात्रा काढण्यात आली. शहरात ठिकठिकाणी श्रद्धांजली आणि अंत्यदर्शन झाल्यानंतर फुलचूरमार्गे त्यांचा मृतहेद नेण्यात आला.**

### सोशल मीडियावर नेत्यांवर आगपाखड

**एरव्ही शहरात लहान–मोठ्या नेत्यांसह गुंडांना देखील शुभेच्छा देणारे होर्डिंग टांगण्यात येतता. आता तर जयस्तंभ चौकाचे नामकरणच होर्डिंग चौक झाले आहे. असे असताना देखील तीन दिवसांपासून वीर सुरेश नागपुरे यांना वीरमरण आल्याचे माहित झाल्यानंतर देखील नेतेमंडळींनी त्यांना श्रद्धांजली देणारे साधे फलक लावले नाही. यावेळी नेतेमंडळींवर नेटिझन्सनी आगपाखड केली.**

### पाच महिन्यंची मुलगी झाली पोरकी

**अवघ्या ३४ वर्षे वय असलेल्या सुरेश नागपुरे यांचे अकाली निधन झाले. त्यांना पाच महिन्यांची मुलगी आहे. तसेच पत्नी, आई–वडील, दोन भाऊ, बहिण असा मोठा आप्त परिवार आहे. त्यांच्या अकाली जाण्यामुळे त्यांची पाह महिन्यांची मुलगी पोरकी झाली.**

# नवेगाव राष्ट्रीय उद्यानात प्रथमच दुर्मिळ माकड कोड फुलपाखरू दिसले



“बिग बटरफ्लाय मंथ–२०२३” मध्ये नवीन रेकॉर्ड

**अर्जुनी/मोरगाव:** सप्टेंबर महिना हा ‘बिग बटरफ्लाय मंथ’ म्हणून साजरा केला जातो. या फुलपाखरु महिन्याच्या निमित्ताने नवेगाव राष्ट्रीय उद्यानातील फुलपाखरांच्या विविधतेच्या हंगामी सर्वेक्षणात नवेगाव राष्ट्रीय उद्यानाच्या जांभळी गेटजवळ दुर्मिळ माकड कोड किंवा मंकी पजल फुलपाखरू (राथिंडा अमोर) नुकतेच दिसून आले. जैवविविधता अभ्यासक व स्थानिक एस.एस.जयस्वाल महाविद्यालयातील सहयोगी प्राध्यापक डॉ.गोपाल पालीवाल, प्रा. भीमराव लाडे धाबेपौनी, प्रा. डॉ.सुधीर भांडारकर, एमबी पटेल कॉलेज देवरी यांनी प्रथमच या दुर्मिळ फुलपाखराची माहिती दिली.

यापूर्वी या फुलपाखरूची नोंद भारतातील दक्षिण आणि पूर्वेकडील राज्ये, केरळ, कर्नाटक, आंध्र प्रदेश, ओडिशा, तामिळनाडू, छत्तीसगड, गोवा, पश्चिम बंगाल, बिहार आणि महाराष्ट्रात डॉ. टिपले आणि डॉ. भागवत यांनी याच वर्षी यापूर्वी नोंदवले आहे.

नवेगाव राष्ट्रीय उद्यान हे महाराष्ट्राच्या पूर्व विदर्भात कोरड्या मिश्र जंगलापासून पावसाच्या जंगलापर्यंतच्या वनस्पतींच्या विविधतेसाठी लोकप्रिय आहे. हे दक्षिणेकडील उष्णकटिबंधीय कोरडे जंगल वैविध्यपूर्ण वन्यजीवांनी समृद्ध आहे आणि मध्य भारतातील एक महत्त्वाचे संरक्षण घटक आहे.

नवेगाव राष्ट्रीय उद्यानात विविध कुटुंबांतील सुमारे ७० प्रजातींची फुलपाखरे यापूर्वीच दिसली आहेत. मंकी पझल बटरफ्लाय हे लाइकेनिड कुटुंबातील एक आकर्षक फुलपाखरू आहे. नवेगाव नॅशनल पार्कच्या जांभळी गेटजवळ इक्सोरा (जंगल जीरॅनियम) वनस्पती वर हे दिसून येते. इक्सोरा वनस्पती हे माकड कोड फुलपाखराच्या यजमान वनस्पतींपैकी एक आहे.


या फुलपाखराचे सामान्य नाव त्याच्या पंखांखाली दिसनाऱ्या गुंतागुंतीच्या कोड्यासारखे पॅटर्न मूळे किंवा त्याच्या विशिष्ट लँडिंग पॅटर्नमुळे असू शकते.

या यशाबद्दल प्राचार्य डॉ.ईश्वर मोहर्ले, डॉ.अरुण झिंगरे, रुपेश निंबाराते, छत्रपाल चौधरी, कुलदीपसिंह बाचिल, प्रवीण रणदिवे, विवेक बावनकुळे यांच्यासह अनेक निसर्गप्रेमी संशोधकांनी अभिनंदन केले आहे.

# चार पर्यटनस्ळांसाठी २.८ कोटींची निधी

## खासदार प्रफुल्ल पटेल यांचे प्रयत्न: राज्य शासनाने दिले कार्यारंभाचे आदेश

**गोंदिया:** पर्यटन विकासातून जिल्ह्यातील बेरोजगारांना रोजगार उपलब्ध व्हावा या पर्यटनस्थळाकडे लोकांना ओघ वाढावा, या दृष्टीकोनातून खासदार प्रफुल्ल पटेल यांनी पर्यन विकासाकडे लक्ष वेधले. वर्षभरापुर्वी सुचविलेल्या ७.७० कोटी पर्यटन विकसाची कामे मंजूर करण्यात आली. मात्र ती कामे थांबविली होती. या संदर्भात खासदार पटेल यांनी पाठपुरावा केल्याने त्या थांबविलेल्या कामांना निधी उपलब्ध करुन पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागने पुन्हा कार्यारंभाचे आदेश दिले. जिल्ह्यातील नवेगावबांध, चोरखमारा, प्रतापगड, बोदलकसा या चार पर्यटनस्थळाच्या विकासासाठी २ कोटी ७७ लाखाची निधी मंजूर करण्यात आली आहे. यामुळे पर्यटन विकासाला चालना मिळणार आहे.



गोंदिया जिल्ह्याच्या पर्यटन स्थळाच्या विकासासाठी माजी आमदार राजेंद्र जैन यांनी खासदार प्रफुल्ल पटेल यानचे लक्ष वेधले होते. जिल्ह्यातील पर्यटनस्थळ विकसित व्हावे यासाठी खासदार पटेल हे सतत प्रयत्नरत राहतात. २०२१–२२ या आर्थिक वर्षात गोंदिया जिल्ह्यातील पर्यटन स्थयाचा विकास कामे प्रस्तावित करण्यात आले. त्या कामांना प्रशासकीय मान्यताही देण्यात आली होती. मात्र कार्यारंभापुर्वीच राज्यसरकारने मंजूर कामांना थांबविण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे विकासकामे रखडली. दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष राज्य सरकारत सहभागी होताच विकास कामाना गती देण्याचे काम सुरु केले.

थांबविलेल्या कामांना पुन्हा कार्यारंभाचा आदेश देण्यात यावे, यासाठी खासदार पटेल यांनी संबंधित विभागाशी सतत पाठपुरावा केला. परिणामी, राज्याच्या पर्यटन व सांस्कृतीक विभागाने ८ सप्टेंबर रोजी शासन निर्णय निर्गमित करुन २०२१–२२ मध्ये थांबविलेल्या पर्यटन विकासाच्या कामावरील स्थिगिती उठवून पुन्हा कार्यारंभ करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच अंदाजे रकमेपैकी काही हिस्स्याची निधीही कामांसाठी उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

गोंदिया जिल्ह्यातील नवेगावबांध, प्रतापगड, चोरखमारा व बोदलकसा या चार पर्यटनस्थळाच्या विकासासाठी २ कोटी ७७ लाखांचा निधी उपलब्ध करुन देण्या आला आहे. या मंजूर कामांना ३१ मार्च २०२४ पर्यंत पूर्ण करण्याच्या सुचनाही संबंधित यंत्रणेला देण्यात आले आहे. खासदार पटेल यांच्या पुढाकाराने जिल्ह्यातील पर्यटन विकासाला चालना मिळणार आहे. यामुळे जिल्ह्यातील नागरिकांनी प्रफुल्ल पटेल व माजी आमदार राजेंद्र जैन यांचे आभार मानले आहे.

### पर्यटनस्थळी ६० विकास कामांना मंजुरी

**खासदार प्रफुल्ल पटेल यांच्या पुढाकाराने जिल्ह्यातील चार पर्यटनस्थळाच्या विकासासाठी ७७० लाख रुपयांचे अंदाजित कामे राज्य शासनाकडे प्रस्तावित करण्यात आले. त्यापैकी राज्य शासनाने २ कोटी ७६ लाख रुपयांचा निधी पर्यटन विकासांतर्गत जिल्ह्यातील नवेगावबांध, प्रतापगड, चोरखमारा व बोदलकसा या चार स्थळाच्या विकासासाठी मंजूर केला आहे. यमध्ये नवेगावबांध पर्यटनस्थळाच्या १२ कामांसाठी ५४ लाख, प्रतापगडच्या १७ कामांसाठी ७१ लाख, चोरखमाराच्या १६ कामांसाठी ८४ लाख व बोदलकसच्या १५ कामांसाठी ७८ लाखांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.**

# क्षयरुग्णांची माहिती लपवाल तर खबरदार



**गोंदिया:** क्षयरोग हा संसर्गजन्य आजार असून यचा प्रमुख १० आजारांमध्ये समावेश आहे. जगात दर दोन मिनिटांत क्षयरोग प्रतिबंध औषधी न घेणारे तीन क्षयरुग्ण आजार व क्षयरोगामुळे होणाऱ्या मृत्यूच्या प्रमाणात लक्षणीय वाढ होत आहे.

सन २०२५ पर्यंत देशातून क्षयरोगाचे उच्चाटन करण्याचे उद्दीष्ट आहे. क्षयरोगाचे लवकर निदान करुन उपचार होणे आवश्यक आहे. या रोगाचा फैलाव टाळणे व प्रत्येक क्षयरुग्णास क्षयरोगमुक्त करण्यासाठी खाजगी क्षेत्रातील प्रयोगशाळा, औषध विक्रेते आणि वैद्यकीय व्यावसाजीकांनी आरोग्य खात्याकडे त्यांच्याकडे निदान झालेल्या क्षयरुग्णांची माहिती देणे बंधनकारक आहे. माहिती न दिल्यास त्यांच्याविरुद्ध भारतीय दंड विधानानुसार कडक कार्यवाही करण्यात येईल, असे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नितीन वानखेडे यांनी कळविले आहे.

प्रधानमंत्री टीबीमुक्त भारत अभियान व राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत संशयित क्षयरुग्णांसाठी जिल्ह्यात क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम सुरु आहे. भारतीय राजपत्रानुसार १९ मार्च २०१८ च्या खाजगी वैद्यकीय व्यावसायिक, प्रयोगशाळा व खाजगी औषध विक्रेत्यांनी त्यांच्याकडे निदान झालेल्या प्रत्येक क्षयरुग्णाची नोंद शासनाकडे करणे बंधनकारक आहे. परंतु काही खाजगी वैद्यकीय व्यवसायीक, प्रयोगशाळा आणि औषध विक्रेते त्यांच्याकडे निदान होणाऱ्या क्षयरुग्णांची नोंदनी करीत नसल्याचे निदर्शनास आल्याने व या रोगाची गंभीता ओळखून जर निदान होऊनही क्षयरुग्णांची नावे जिल्हा क्षयरोग केंद्राकडे न पाठविल्यास ही बाब गंभीर समजून संबंधिताविरुद्ध गुन्हा दाखल केला जाणार आहे.

यामुळे संबंधितांनी क्षयरुग्णांची माहिती किमान दरमहा कळवावी किंवा dtomhgdy@rntcp.org या मेल आयडीवर पाठविण्यात यावी, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे. खाजगी क्षेत्रातील प्रयोगशाळा, औषध विक्रेते आणि वैद्यकीय व्यावसायीकांसाठी शासकीय नवीन योजना कार्यान्वित असून, त्याअंतर्गत नवीन क्षयरुग्ण संदर्भित केल्यास संबंधित व्यक्तीच्या बँक खात्यात ५०० रुपये जमा केले जातात. खाजगी डॉक्टरांसाठी क्षयरुग्णांचे निदान करुन क्षयरोग केंद्रात रुग्णांची नोंद केल्यास ५०० रुपये व उपचार पूर्ण झाल्याची नोंद केल्यास ५०० रुपये देण्यात येतात. उपचार सहायकास क्षयरुग्णांचा उपचार पूर्ण केल्यास एक हजार रुपये देण्यात येतात. प्रत्येक क्षयरुग्णाला उपचार पूर्ण होईपर्यंत प्रतिमहा ५०० रुपये इतके अनुदान पोषक आहाराकरिता रुग्णांच्या बँक खात्यात जमा केले जाते.

### कारावास व दंडाची शिक्षा

**क्षयरुग्णांची माहिती न दिल्यास कलम २७९ अन्वये सहा महिन्यांचा कारावास अथवा दंड किंवा दोन्ही शिक्षा तसेच कलम २७० अन्वये जाणूनबुझून द्रेषपूर्ण घातक कृत्यामुळे जीवीतास हानी पोहोचवती असल्याचे नमूद करण्यात येते. जास्तीत–जास्त दोन वर्षापर्यंत कारावास अथवा दंड अशी शिक्षा करण्याची तरतूद आहे. अशा प्रकारची कारवाई जिल्ह्यात कुणावर होऊ नये यासाठी खाजगी वैद्यकीय व्यवसायक, प्रयोगशाळा व खाजगी औषध विक्रेत्यांनी निदान होणाऱ्या क्षयरुग्णांची माहिती नि:क्षय पोर्टलवर नोंदविणे बंधनकारक आहे. त्याचबरोबर खाजगी प्रयोगशाळांनी प्रपत्र १, खाजगी वैद्यकीय व्यावसायकांनी क्षयरुग्णांची नोंद माहिती प्रपत्र २ व खाजगी औषध विक्रेत्यांनी त्यांच्याकडे क्षयरुग्ण व औषधीची माहिती प्रपत्र ३ मध्ये लेखी जिल्हा क्षयरोग केंद्रात कळवायची आहे.**

**खाजगी वैद्यकीय व्यवसायीक, प्रयोगशाळा आणि औषध विक्रेत्यांकडे निदान होणाऱ्या क्षयरुग्णांची नोंदणी करीत नसल्याचे निदर्शनस आले आहे. या रोगाची गंभीरता ओळखून जर क्षयरुग्णांची नावे जिल्हा क्षयरोग केंद्राकडे न पाठविल्यास ही बाब गंभीर समजून संबधिताविरुद्ध कलम २७९ अन्वये सहा महिन्यांचा कारावास अथवा दंड किंवा दोन्ही शिक्षा तसेच कलम २७० अन्वये जाणूनबुजून द्रेष–पूर्ण घातक कृत्यामुळे जीवितास हानी पोहोचवीत असल्याचे नमूद करण्यात आले आहे.**

**डॉ. नितीन कापसे,** जिल्हा क्षयरोग अधिकारी

# गोंदियाच्या मिल्खासाठी सरसावला विधानसभा ग्रुप



**गोंदिया:** शहरातील धावक मुन्नालाल यादव यांना गोंदियाचे मिल्खा सिंग नावाने ओळखले जाते. यादव दुबई येथे आयोजित आंतरराष्ट्रीय दौड स्पर्धेत सहभाग घेत आहे. मात्र त्यांची परिस्थिती हलाखीची असून दुबई जाण्याकरिता पैसे नसलयाची चिंता सतावत होती. मात्र दुसऱ्यांच्या सेवेसाठी धावणारा सोशल मिडियावरील गोंदिया विधानसभा व्हॉट्ट्सअॅप ग्रुपच्या सदस्यांनी लोकवर्गणी करुन मदत करण्याचे ठरविले. दरम्यान काही तासात ग्रुपच्या सदस्यांनी पुढे येऊन ५५ हजार ५५५ रुपये जमा केला. दरम्यान शनिवार (दि.९) रोजी ५५.५५५ रुपयांचा धनादेश मुन्नालाल यादव यांना ग्रुपच्या सदस्यांनी सुपूर्द केले.

शहरातील धावक मुन्नालाल यादव यांनी अनेक राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दौड स्पर्धेत सहभाग घेऊन गोंदिया जिल्ह्याचा नाव लौकिक केले आहे. त्यांचे वय ८० झाले आहे. तरीसुद्धा ते नियमित दौडचा अभ्यास करत असून अनेक किलोमीटर धावतात. मात्र त्यांची वय ८० झाली असून सुद्धा ये गोंदिया जिल्ह्याच्या नाव लौकिक करण्यासाठी अनेक स्पर्धेत सहभागी होतात. त्यातच ऑक्टोबर महिन्यात दुबई येथे आंतरराष्ट्रीय दौड स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत ते सहभग घेणार आहेत. मात्र त्यांची परिस्थिती हलाखीची असून दुबाई येथे जाण्याकरिता त्यांच्याजवळ इतके पैसे नाही. त्यामुज़े या स्पर्धेत कसा सहभाग घेणार याची चिंता त्यांना सतावत होती. दरम्यान, गरीब गरजू लोकांच्या मदतीसाठी सदैव धावून येणाऱ्या शहरातील सोशल व्हॉट्सअॅपमधील गोंदिया विधानसभा ग्रुपच्या सदस्यांनी त्यांची मदत करण्याचे ठरविले. याकरिता ग्रुप अॅडमिन पॅनलने पैसे संकलन केले असता केवळ ५ तासात ५५ हजार ५५५ रुपयांची रकम संकलन करण्यात आले. दरम्यान गोंदिया विधानसभा ग्रुपच्या सदस्यांनी शनिवार, ९ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता मुन्नालाल यादव यांना ५५ हजार ५५५ रुपयांचे धनादेश श्री हनुमान मंदिर ये सुपूर्द करण्यात आला. तसेच सामूहिक हनुमान चालिसचे पठन करुन ते दुबईत आयोजित स्पर्धेत यशस्वी होून यावे याकरिता भगवान चरणी प्रार्थना करण्यात आली.

### यापुर्वी ६० हजारांचे संकलन

शहरातील गोशाळेत पिण्याच्या पाण्याकरिता बोअरवेलची सोय करण्याकरिता गोंदिया विधानसभा ग्रुपच्या अॅडमिन व सदस्यांनी ६० हजार रुपये लोकवर्गणीच्या माध्यमातून संकलन केले होते. त्या रकमेने गोशाळेत बोअरवेलची सोय करण्यात आली होती.

# २ राज्यांच्या वादात पुजारीटोला



**गोंदिया:** सालेकसा तालुक्यातील साखरीटोलापासून हाकेच्या अंतरावर पुजारीटोला धरण आहे. या धरणाला लागून वसाहत आहे. परंतु मागील आठ ते दहा वर्षांपासून महाराष्ट्र व मध्यप्रदेश शासन यांच्या निधीअभावी पुजारीटोला धरणाचा विकास खुंटलेला दिसून येत आहे.

महाराष्ट्र शासन व मध्यप्रदेश शासन यांच्या संयुक्त विद्यमाने पुजारीटोला धरणाची निर्मिती झाली. या धरणाला लगत सुंदर बगीचा व विश्रामगृह बांधले होते. परंतु महाराष्ट्र व मध्यप्रदेश शासनाच्या कारभारामुळे या धरणाच्या विकास खुंटला आहे. मागील आठ ते दहा वर्षांपासून तेथील विश्रामगृह जीर्ण अवस्थेत आहे. तसेच बगीचाची नासधून झालेली दिसून येत आहे. याकडे ना शासनाचे लक्ष आहे. ना लोकप्रतिनिधींचे लक्ष आहे. त्यामुळे आता या धरणाचा विकास कोण करणार? असा प्रश्न परिसरातील नागरिक करीत आहेत. दोन्ही शासनाने लक्ष देऊन या धरणाच्या विकास केला, तर स्थानिकांनाही रोजगाराची संधी मिळेल. तसेच पुजारीटोला धरण प्रसिद्ध असल्यामुळे महाराष्ट्र, मध्यप्रदेश, छत्तीसगड या राज्यांतून पर्यटक भेट देतात. परंतु पर्यटकांसाठी योग्य सुविधा नसल्यामुळे पर्यटकांचे प्रमाण कमी झाले आहे. प्रशासनाचे योग्य सुविधा दिल्यास त्यातून महसूल मिळू शकतो. आतातरी दोन्ही प्रशासनाने लक्ष देऊन विकासासाठी प्रयत्न करावे अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# जलजीवनच्या कामामुळे रस्ता खड्डेमय



**बोंडगावदेवी:** अर्जुनी मोरगाव तालुक्यातील चान्ना बाक्टी गावातील मुख्य रस्ता जलजीवन योजनेच्या कामानिमित्त खोदण्यात आला. घर घर जल हे ब्रिद उराशी बाळगून स्थानिक पुढाऱ्यांच्या पुढाकाराने कंत्राटदाराने पाईपलाईन टाकण्यासाठी जेसीबीने नाल्या खोदल्या. गावकऱ्यांना विश्वासात न घेता परस्पर कामाला परवानगी दिली. मात्र, पावसाळ्यात गावच्या मुख्य रस्त्याची वाट लागली. रस्त्यावर मोठमोठे जीवघेणे खड्डे निर्माण झाले असून या ठिकाणी अपघात घडण्याची शक्यता आहे.

जलजीवन मिशन अंतर्गत नागरिकांना शुद्ध पिण्याचे पाणी मिळावे, या उद्देशाने गोंदिया जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पाणीपुरवठा योजनेसह नळ जोडणीला मंजूरी देण्यात आली. नियमानुसार ग्रामपंचायत व ग्राम पाणीपुरवठा समितीला विश्वासात घेऊन योजनेचे बांधकाम करणे गरजेचे आहे.

मात्र, जिल्हा परिषदेने कंत्रटदार आणि संबंधित यंत्रणेच्या माध्यमातून कामाला सुरुवात केली. जिल्ह्यातच नव्हे तर अर्जुनी मोरगाव तालुक्यात जलजीवन मिशन अंतर्गत सुरु असलेली कामे आजघडीला अपूर्ण असून नागरिकांसाठी जीवघेणे ठरु लागले आहेत. चान्ना बाक्टी येथे कंत्राटदार नाकाडे व पराग कापगते यांच्या नियंत्रणात योजनेचे काम सुरु आहे. योजनेची पाईपलाईन टाकण्यासाठी गावात जेसीबीच्या माध्यमातून खोदकाम केले. भर पावसाळ्यात नाल्यांचे खोदकाम केल्याने गावातील रस्त्यांचे तीनतेरा वाजले आहेत. रस्त्यावर मोठे खड्डे पडले असून यामुळे पाईलपाईनसाठी खोदलेले खड्डे नागरिक व लहान मुलांसाठी धोकादायक ठरत आहेत. त्याचप्रमाणे चारचाकी वाहनाला रस्त्यावरुन मार्ग काढणे अघवड होत आहे.

परिणामी गावात येया करणारे वाहन खड्ड्यात अडकत आहेत. याबाबत माहिती पाणीपुरवढा अधिकारी नवेगावबांध यांनी विचारणा केली असता त्यांनी कसलीच माहिती नसल्याचे सांगितले. कंत्राटदाराशी संपर्क केला असता वाहतुकीसाठी रस्ता दुरुस्ती करुन देणार असल्याचे सांगितले. वरिष्ठांनी या कामाची चौकशी करुन ज्या गावातील रस्त्याची दुरावस्था जलजीवन पाणीपुरवठा खोदकामामुळे झाली आहे त्या सर्व गावातील रस्त्यांची दुरुस्ती करावी अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

### चार दिवसांपासून एसटी बस बंद

**बाक्टी येथे जलजीवन मिशन अंतर्गत पाईपलाईनकरिता खोदकाम केले. मात्र यामुळे रस्त्याव मोठमोठे खड्डे पडून रस्त्याची दुरावस्था झाली आहे. यामुळे गेल्या चार दिवसांपासून बससेवा बंद असल्याने बसभआवी शालेय विद्यार्थी व प्रवाशांची कोंडी झाली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले. तसेच नागरिकांनाही मोठा त्रास सहन करावा लागला.**

### भर पावसात खोदकाम

**जलजीवन मिशन अंतर्गत प्रत्येक नागरिकाला पिण्याचे स्वच्छ पाणी मिळावे याकरिता पाईलपाईनचे काम सुरु आहे. अनेक गावात पाईपलाईनचे खोदकाम करण्यात येत आहे. मात्र बाक्टी येथे हे खोदकाम संबंधित कंत्राटदाराद्वारे भर पावसाळ्याच्या दिवसात करण्यात आले. त्यामुळे रस्त्याचे तीनतेरा वाजले असून मोठमोठे खड्डे पडले आहे. हे खड्डे आता नागरिकांसाठी कर्दनकाळ ठरत आले. त्यामुळे गावातील नागरिकांमध्ये रोष व्याप्त झाले असून भर पावसाळ्यातच हे काम का सुरु करण्यात आले असा सवाल सुरु करणगात येत आहे.**

# जिल्ह्यात एक शिक्षकी शाळांची संख्या १७८

## शिक्षणाचा खेळखंडोबा: एका शिक्षकाकडे चार वर्ग

**गोंदिया:** जिल्हा परिषदेकडून वारंवार दर्जेदार शिक्षणाचे आश्वासन देण्यात येत आहे. मात्र प्रत्यक्षात स्थिती त्याविपरीत आहे. एक हजारावर शाळा असलेल्या जिल्हा परिषदेच्य तब्बल १७८ शाळा एकाच गुरुजीच्या भरवशावर सुरु आहेत. एक दोन नव्हे तर चक्क चार वर्ग इतर शासकीय कामे करुन सांभाळावे लागत आहे. त्यामुळे शिक्षणाची अवस्था काय असेल, याची कल्पनाच न केलेली बरी.

जिल्हा परिषदेतर्फे एकही बालक शिक्षणापासून वंचित राहू नये याकरिता विविध अभियान आणि उपक्रम राबविण्यात येत आहेत. सध्या शाळाबाह्य बालकांचा शोध घेण्यात येत आहे. त्या बालकांना नजीकच्या शाळांमध्ये दाखल करण्यात येत आहे. तर दुसरीकडे शाळांमध्ये बालकांना शिकविण्याकरिता गुरुजीच उपलब्ध नसल्याचे जळजळीत वास्तव आहे. आमगाव तालुक्यात ८, अर्जुनी मोरगाव २२, देवरी ४६, गोंदिया ११, सालेकसा ३२ आणि तिरोडा तालुक्यात २५ शाळा एकाच शिक्षकाच्या भरवशावर सुरु आहेत. अनेक शाळांमध्ये पहिली ते चौथी पर्यंतचे वर्ग आहेत. त्या चार वर्गांना एकच शिक्षक ज्ञानदान करत आहेत. शिक्षकांकडे शिकविण्याव्यतिरिक्त अनेक प्रकारची शाळाबाह्य कामे थोपविण्यात आली आहेत. शासनाच्या त्या कामांची देखील अंमलबावणी करावी लागते. शिवाय एकच शिक्षक असल्याने बैठका, प्रशिक्षणांना देखील उपस्थित राहावे लागते. अशा अवस्थेत त्या शाळांतील बालकांचे किती ज्ञानर्धन होत असावे, याचे विचारमंथन करण्याची गरज निर्माण झाली आहे.

उल्लेखनीय म्हणजे सालेकसा आणि देवरी तसेच अर्जुनी मोरगाव हे तालुके नक्षलग्रस्त आणि आदिवासीबहूल व दुर्गम आहेत. या तालुक्यात काम करणाऱ्या शिक्षकांना विशेष भत्ता दिला जातो. सर्वाधिक एक शिक्षकी शाळा याच तालुक्यात असल्यामुळे शासन आणि प्रशासनाचे दुर्गम भागाकडे बघण्याचा दृष्टीकोन लक्षात येत आहे.



### स्वयंसेवकांची मदत

**जिल्ह्यात शिक्षकांची नऊशेवर पदे रिक्त आहेत. शासनातर्फे जोपर्यंत शिक्षकांची रिक्त पदे भरली जात नाही. तोपर्यंत ही समस्या कायम राहणार आहे. मात्र विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यासाठी स्वयंसेवकांची मानधन तत्वावधर नेमणूक करण्यात येत आहे.**

**यशवंत गणवीर, शिक्षण समिती सभापती**